आणि
ग्रंथोपजीविये
५
रामदास खरे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

आणि ग्रंथोपजीविये-५

लेखक : रामदास ग. खरे

a

आणि ग्रंथोपजीविये-५

लेखक : रामदास ग. खरे

सी-२१३, चंद्रवदन सोसायटी क्र. १,

गणेशवाडी, कौशल्य हॉस्पिटल समोर

पांचपाखाडी, ठाणे-४०० ६०१.

भ्रमणध्वनी : ९८६९०१४३१९ आणि ७५०६२६०२७४.

इमेल : rgkhare64@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com
esahity@gmail. com
Whatsapp- 9987737237
विनामूल्य पुस्तके नियमित मिळवण्यासाठी आपले नाव व गाव कळवा
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : १३ फेब्रुवारी २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

*** लेखकाचा परिचय ***

रामदास ग. खरे

जन्म : १३ फेब्रुवारी १९६४, ठाणे. वाणिज्य शाखेची पदवी. तीस वर्षे बँकिंग क्षेत्रात काम करून २०१७ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली. लेखनाबरोबरच चित्रकला, फोटोग्राफी, संगीत, दुर्गभ्रमंती, असे छंद जोपासत आहे. विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींची दुर्मिळ अशी ३५० हस्ताक्षर-पत्रे संग्रहित केली आहेत. जून २०१८ मध्ये आर्ट-प्रिव्हिलेज, ठाणे येथे पहिले सोलो पेंटिंग प्रदर्शन संपन्न झाले. विविध पुस्तकांची, नियतकालिकांची मुखपृष्ठे रेखाटली आहेत. आजवर एकूण १४ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

प्रकाशित साहित्य : कवितासंग्रह: स्पंदन (१९९४), जीर्णदेव्हारा (२००४), सी.टी.स्कॅन- (२०१५), आता अटळ आहे (२०२१).

संकीर्ण : कॅलिडोस्कोप -(लेख संग्रह) (२०१७), पत्रसंवादु (लेख संग्रह)- (२०१८), ओळख वाद्यांची मैत्री स्वरांशी (२०२१), पत्रास कारण की- लेख संग्रह (२०२३), आणि ग्रंथोपजीविये-ईबुक (२०२१ ते २०२४) (भाग ५)

चरित्र लेखन: प्रभो शिवाजीराजा - (२०१८), शूर आम्ही सरदार- (२०१९), असे घडले गांधीजी (२०२१), मनकर्णिका-राणी लक्ष्मीबाई (२०२३)

a

कथासंग्रह : केमिस्ट्री (२०२२).

आगामी पुस्तके : स्मरण महाराष्ट्राचे, निमित्त भटकंतीचे (लेखसंग्रह), द लॉस्ट बॅलन्स (कादंबरी)

सदर लेखन : लोकसत्ता, गावकरी, लोकमत, महाराष्ट्र दिनमान.

लाभलेले पुरस्कार :

अंकुर वाङ्मय पुरस्कार (२००४), शिवांजली साहित्य गौरव पुरस्कार, जुन्नर (२०१६) , कोकण मराठी साहित्य परिषद, कल्याण शाखा आणि अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान -'अक्षरगंध' पुरस्कार (२०१९), सूर्योदय काव्य पुरस्कार-जळगाव (२०२१), कोमसापचा कवी आरती प्रभू पुरस्कार (२०२२), मराठी वाङ्मय परिषद, बडोदा यांचे उत्कृष्ट कथासंग्रह पारितोषिक (२०२३), शिवानी पब्लिकेशन, मुंबई (२०२३).

विविध ठिकाणी संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कविता सादरीकरण तसेच आकाशवाणी, मुंबई येथे कविता वाचन, कथा वाचन.

रामदास खरे यांची ईसाहित्यवर प्रकाशित पुस्तके



कव्हर क्लिका,
पुस्तक वाचा

** लेखकाचे मनोगत **

नमस्कार. 'आणि ग्रंथोपजीविये' या माझ्या पाचव्या ईबुक भागाचे प्रकाशन आज, माझ्या वाढदिवशी, मान्यवरांचे हस्ते होत आहे याचा आनंद आणि समाधान शब्दातीत आहे. त्या त्या लेखकांच्या मूळ साहित्यकृतीकडे / पुस्तकाकडे घेऊन जाणाऱ्या या ईबुक पुस्तकाचे जोरदार स्वागत वाचक-रसिकांनी केलेच आहे. यापूर्वी ईबुक क्रमांक १ चे प्रकाशन दि. १० सप्टेंबर २०२१ रोजी कवी,समीक्षक अरविंद दोडे यांचे हस्ते, ईबुक क्रमांक २ चे प्रकाशन ९ ऑक्टोबर २०२१ रोजी ज्येष्ठ समीक्षक, संशोधक डॉ अनंत देशमुख यांचे हस्ते, ईबुक क्रमांक ३ चे प्रकाशन दि. ७ नोव्हेंबर २०२१ रोजी कवी, अनुवादक सतीश सोळांकूरकर यांचे हस्ते, ईबुक क्रमांक ४ चे प्रकाशन दि. ३ डिसेंबर २०२१ रोजी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नाशिक येथे ज्येष्ठ समीक्षक, लेखक रविप्रकाश कुलकर्णी यांचे हस्ते संपन्न झालं. त्यानंतर तब्बल दोन वर्षानंतर पाचव्या ईबुक पुस्तकाचे प्रकाशन आज मान्यवरांचे हस्ते होत आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे या दोन वर्षाच्या कालावधीत माझे कथालेखन, स्तंभलेखन, कादंबरी लेखन सुरु होते. याच कालावधीत माझी एकूण चार पुस्तके प्रकशित झाली. माझे इतर वाचन काहीसे मंदावले. मात्र त्याही गडबडीत काहीसा वेळ गवसताच मला भावलेल्या पुस्तकांवर मी लिहिले, ते प्रसिद्धही झाले. यावर्षी मात्र या तेरा परीक्षणांचे पुन्हा ईबुक

काढण्याचे ठरवले. कविता, कथा, कादंबरी, ललित, समीक्षा, संशोधनात्मक अशा सर्व विषयांवरील पुस्तकांचा अंतर्भाव यात केला आहे. या अगोदर ५० परीक्षणे चार ईबुक द्वारे वाचकांसमोर आली आहेतच. आता या पाचव्या भागात अनुक्रमांक ५१ ते ६४ अशी १४ परीक्षणे समाविष्ट केली आहेत.

सर्वप्रथम ईबुकमध्ये ज्या पुस्तकांवर मला लिहिता आले त्या पुस्तकांच्या सर्व लेखक-कवी मंडळींचे तसेच प्रकाशकांचे मनापासून आभार. त्या त्या पुस्तकांनी मला निखळ आनंद दिला, दृष्टी दिली तसेच मला समृद्धही केलं. ज्या वृत्तपत्रात, मासिकात परीक्षणे प्रसिद्ध झाली त्या साप्ताहिक सकाळ, दैनिक सकाळ, झपुर्झा (त्रैमासिक), लोकमत, ठाणे वैभव यांच्या संपादकांचे मनापासून आभार. ज्येष्ठ कवी, संत साहित्याचे अभ्यासक श्री अरविंद दोडे यांनी माझ्या ईबुकची पाठराखण (blurb) केली आहे, त्यांचेही आभार. आणि सर्वात महत्वाचे ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रकाशक, ग्रंथप्रेमी, उत्तम वाचक, रसिक, लेखक श्री सुनील सामंत यांचे आभार. त्यांच्या सहकार्याशिवाय हे ईबुक आपणापाशी पोचलेच नसते.

'आणि ग्रंथोपजीविये- भाग ५' या ईबुक पुस्तकाचा गंध जगभरातील वाचक रसिकांपर्यंत, ग्रंथप्रेमींपर्यंत, आणि ग्रंथालयांपर्यंत दरवळू दे अशी प्रार्थना श्री सरस्वती देवीच्या चरणी करतो आणि तूर्तास थांबतो. धन्यवाद.

रामदास खरे, ठाणे.

शुभेच्छा

या पुस्तकात साधारणतः साठोत्तरीतील अभिजात ग्रंथांपासून आताच्या काळातील दर्जेदार ग्रंथांचा सखोल परिचय करून देण्यात आला आहे. आस्वादक समीक्षेला परीक्षणाचा वेगळा आयाम देताना कवी, लेखक, चित्रकार रामदास खरे यांचा हा वेगळा पैलू ग्रंथमित्रांसमोर येत आहे. दुर्गा भागवतांच्या 'पैस' पासून सुरु झालेल्या या यात्रेत ग्रेस, श्री. ना. पेंडसे, गोनीदा, जयवंत दळवी, मतकरी, महानोर, पाडगावकर, मधु मंगेश कर्णिक, खानोलकरांना सामावून घेत पुढील पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणारे अच्युत गोडबोले, मंगला आठलेकर, डॉ. अनंत देशमुख, अशोक बागवे, डॉ. वसुधा सहस्रबुद्धे आदी नामवंतांचा सहभाग आहे. तर नव्या पिढीतील प्रणव सखदेव, किरण येले, सतीश सोळांकूरकर, प्रतिभा सराफ, गीतेश शिंदे, बाळासाहेब लबडे, सुजाता राऊत आदींच्या पुस्तकांची दखल घेताना रामदास खरे यांनी सारांशात त्या साहित्यिकांची वाटचालही अधोरेखित केली आहे. एकूण ६४ परीक्षणांची पाच ईबुक साकारण्याची करण्याची कल्पना अभिनव आहे. हा केवळ भाष्यग्रंथ नसून स्वतःची निरीक्षणे सुद्धा लेखकाने नोंदविलेली आहेत. हा एक सुंदर आणि संग्राह्य ग्रंथानुभव आहे. या 'ई-बुक' चे स्वागत वाचक- रसिक, ग्रंथप्रेमी करतीलच असा विश्वास आहे.

अरविंद दोडे (कवी, समीक्षक, निरुपणकार)

a

** अनुक्रमणिका **

५१. अस्वस्थ वर्तमानाचे प्रभावी चित्रण: प्राप्तकाल. पद्मश्री मधु मंगेश कर्णिक

५२. काळाची गरज : र. धों. कर्वे समजून घेताना.... डॉ. अनंत देशमुख

५३. एक प्रयोगशील कादंबरी : चतुर..... प्रणव सखदेव

५४. अस्वस्थ काळाच्या नोंदी.... पांडुरंग सुतार

५५. अरण्येश्वरी : एक मुक्त चिंतनिका.... अरविंद दोडे

५६. एक संयत,सूचक अंतःस्वर.... प्रा. प्रतिभा सराफ

५७. जावे गझलेच्या गावा.... डॉ प्रा. बाळासाहेब लबडे

५८. प्रखर जाणिवांचा सातबारा... रमेश सावंत

५९. प्रत्ययकारी कवितांचा कॅनव्हास.... विलास गावडे

६०. सहजसुंदर आत्मचिंतन .... प्रा.सुजाता राऊत

६१. निखळ माणूसपण जपणाऱ्या चौकटीबाहेरच्या कथा. प्रियांका पाटील

६२. स्त्री जाणिवेचा अस्वस्थ पदर... संगीता अरबुने

६३. प्रगल्भ कवितांचा कॅनव्हास.... माधुरी चौधरी

६४. स्मरणरंजनाचा कॅलिडोस्कोप : स्थानपोथी... डॉ अनंत देशमुख

५१.** अस्वस्थ वर्तमानाचे प्रभावी चित्रण : प्राप्तकाल **



' साहेब, ही समाधी दिसते ती आमच्या कुलपुरुषाची, शेजारी त्यांच्या पत्नीचं - सतीचं वृंदावन, दोनअडीचशे वर्षापूर्वीचं. याच कुलपुरुषांच्या नावाने आमच्या पूर्वजांनी वाढवलेली ही राई. पुढे जाऊन एकेका झाडाचा बुंधा पहा म्हणजे ती किती जुनी होती ते समजेल '. डीएफओ आणि त्यांचे वनाधिकारी झाडाच्या तोडलेल्या बुंध्याकडे जाऊन निरीक्षण करू लागले. बुंध्यावरची वर्तुळे ते निरखून पाहू लागले. डीएफओ कळवळून म्हणाले, ' सर, पाहवत नाही हा

विनाश. ही सगळी झाडं किमान तीनशे वर्षांची होती. सागवान, शिसम, फणस ओळखता येतात. नथिंग मोअर क्रूइल दॅन धिस.'

'प्राप्तकाल' या महाकादंबरी मधल्या पृष्ठ एकशे चौदा वरील मजकुरावर वाचक क्षणभर थांबतो आणि अगदी सहज मुखपृष्ठाकडे वळतो. मुखपृष्ठावरचे सारे संदर्भ त्याला उलगडू लागतात आणि वाचक पुन्हा झपाटल्यासारखा कादंबरीच्या विश्वात हरवून जातो. एखाद्या पुस्तकाचे मुखपृष्ठ म्हणजे जणू त्या पुस्तकाचा आरसा किंवा प्रतिबिंबच असते. 'प्राप्तकाल' या बहुचर्चित महाकादंबरीचे मुखपृष्ठ हे असेच. सूर्यास्ताच्या पार्श्वभूमीवर कुठल्याशा जंगलावर महाकाय जेसीबी, पोकलेन यंत्रांचा आघात होतोय. त्या जंगलात बागडणारा अश्राप मोर तोडलेल्या निर्जीव झाडांच्या कलेवर दीनवाणा उभा आहे. काही मंडळी याप्रकाराविरुद्ध आवाज उठवत आहेत. अशाच वेळी एक कोवळा, लुसलुशीत कोंब या परिस्थितीवर मात करून पुनर्जन्म घेत आहे. कादंबरीची पानं जसजशी उलटत जातात तसतसा या मुखपृष्ठावरचा आशय गडद होत जातो. आपण त्यातील व्यक्तिरेखांमध्ये गुंतत जातो. म्हणून मुखपृष्ठ तेवढेच महत्वाचे. त्यासाठी चित्रकार पुंडलिक वझे यांचे विशेष अभिनंदन.

कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक, कविता, कथा, ललित, व्यक्तिचित्रे, कादंबरी बालकथा, नाटक, वैचारिक, संपादन अशा विविध विषयांवर सत्तरच्या वर पुस्तके प्रकाशित झालेले एक महत्वाचे लेखक, रत्नागिरी येथे भरलेल्या ६४ व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, आज वयाच्या ९१ व्या वर्षी देखील जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सातत्याने मौलिक लेखन करणारे तुमचे, आमचे सर्वांचे लाडके मधुभाई

म्हणजेच ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री श्री मधू मंगेश कर्णिक यांच्या नुकतीच प्रकाशित झालेल्या बहुचर्चित ' प्राप्तकाल' या महाकादंबरी वाचण्याची उत्सुकता होती. मधुभाईंनी ही कादंबरी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत लिहिली आहे म्हणून त्यांचे विशेष कौतुक. या महाकादंबरीचे प्रकाशन दि. २५ मार्च २०२२ रोजी आमच्या ठाण्यात गडकरी रंगायतन येथे मान्यवरांच्या हस्ते झालं. त्यावेळी मनोगतामध्ये या कादंबरीबद्दल त्यांनी थोडक्यात पण मौलिक सांगितलं ते अजूनही मला आठवतंय.

मधुभाई म्हणाले. ' प्राप्तकाल म्हणजे सध्याचा काळ म्हणजेच वर्तमान काळ. हा काळच या कादंबरीचा खरा नायक आहे. मी काळाबरोबर जाणारा लेखक आहे. मी ऐतिहासिक लेखनात रमत नाही. आजूबाजूचं अस्वस्थ जगणं मी या प्राप्तकाल कादंबरीत रेखाटलं आहे. या काळात मला मध्यमवर्गीय कुठेतरी हरवलेला दिसला. समाजसुधारक कुठेच दिसत नाहीत. या वर्तमानकाळात पराकोटीची जातीयता, धार्मिकता, विषमता, राजकारणातली विद्रुपता, स्वार्थ हे सारं मनाला यातना देणारं ठरत आहे. सध्या जे राजकारण सुरू आहे ते माझ्या ९० वर्षाच्या आयुष्यात कधी असे पाहिले नाही बावीस वर्षाचा आत्ताचा काळ मी यात घेतला आहे. यापूर्वी प्रकाशित झालेल्या संधीकाल या माझ्या कादंबरीचा हा पुढचा भाग आपण म्हणूया.'

अगदी खरं आहे. प्राप्तकाल वाचण्यापूर्वी, त्यावर भाष्य करण्यापूर्वी मधुभाईंची २००१ मध्ये प्रकाशित झालेली 'संधीकाल' ही कादंबरी प्रथम वाचणं आवश्यक आहे. या संधीकाल कादंबरीत विसाव्या शतकातील घटनांचा उल्लेख आहे. मूल्य आणि विवेक शाबूत असलेला मध्यमवर्गीय हा संधीकाल

कादंबरीचा मुख्य नायक होता. मध्यमवर्गीयांचे जगणं, समाजकारण, अर्थकारण, राजकारण आणि या साऱ्यांमध्ये बदलत जाणारी समीकरणं, निरीक्षणं याचा वेध संधीकाल मध्ये मधुभाईंनी घेतला होता. स्वातंत्र्यप्राप्ती, चळवळ, लढे, सामान्य लोकांच्या आवाजाला दिलेलं महत्व, न्याय, लोकशाहीची प्रतिष्ठापना, प्रगती, विकास, शिक्षण तसेच सामान्य माणसांच्या उन्नतीसाठी चाललेलं समाजकारण, राजकारण याचे प्रभावी चित्रण संधीकाल मध्ये रेखाटलं होतं. 'प्राप्तकाल' चा अवकाश बावीस वर्षाचा. मात्र या बावीस वर्षात झपाट्यानं बदलेली किंवा ऱ्हास पावलेली तत्व, मूल्ये, आदर्श पाहून लेखकाचे मन व्यथित होतं. आणि या अस्वस्थेतूनच साकारली गेली संधीकाल नंतरची प्राप्तकाल ही दीर्घ कादंबरी.

१९५९ साली मधुभाईंचा 'कोकणी ग वस्ती' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला तर १९६२ मध्ये त्यांनी 'देवकी' ही पहिली कादंबरी लिहिली. तर पुढे १९६९ मध्ये प्रकाशित झालेली ' माहीमची खाडी' ही कादंबरी तर साहित्यविश्वात एक माईलस्टोन ठरली. 'देवकी' ते 'प्राप्तकाल' हा प्रवास खरोखरच थक्क करणारा आहे. मधुभाई मूळचे कोकणातले. कोकणातला निसर्ग, तिथली माणसं, चालीरीती, परंपरा, देवदेवस्की हे सारं लिखाणात त्यांनी उतरवलं, पण नंतर नोकरीच्या निमित्ताने मुंबईत आल्यावर त्यांच्या नजरेनं पाहिलेला बकालपणा, गुन्हेगारी, समाज, राजकारण हेही तितक्याच ताकदीनं कागदावर टिपलं. प्राप्तकाल या कादंबरीत कोकण आणि मुंबईच्या जीवनाचं प्रभावी चित्रण आहे. गेल्या बावीस वर्षातली झपाट्यानं बदलणारी सामाजिक परिस्थिती, स्थित्यंतरे, खेड्यात होणारा लक्षणीय बदल, कोकणी माणसाची

मानसिकता, तिथल्या मंडळींचे कारनामे, निसर्गाचा, पर्यावरणाचा चालवलेला ऱ्हास, त्यात भरडली जाणारी अनेक अश्राप कुटुंबं, नवे प्रश्न, त्यांची नवीन उत्तरे, नवीन समीकरणे, गलिच्छ राजकारण, विविध पक्षांचा लेखाजोखा, भक्त आणि कार्यकर्ते, धर्माची व्याख्या, उध्वस्त होणारी संवेदनशील मनाची मनं, अवघ्या जगाला नेस्तनाबूत करणारा करोनाचा महाभयंकर काळ, या साऱ्याचे यथार्थ चित्रण मधुभाईंनी प्रभावी व्यक्तिरेखा उभारून प्राप्तकाल कादंबरीत रेखाटलं आहे. मधुभाईंनी तर आजच्या काळावरचे महत्वाचं भाष्य, थेट संवाद या कादंबरीच्या वाचकांशी केला आहे. कादंबरी वाचताना वाचक रसिक त्यात गुंतत जातो आणि मनाला पडणाऱ्या विविध प्रश्नांच्या वावटळीत हरवून जातो.

कोमसापच्या माध्यमातून मधुभाईंनी साहित्यक्षेत्रात अक्षरशः डोंगराएवढं काम केलं. आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणजे कविश्रेष्ठ केशवसुत. १९९४ मध्ये मधुभाईंनी आपल्या शिलेदारांच्या साथीने कोकणातील 'मालगुंड' इथे केशवसुतांचे सुंदर, सुसज्ज, परिपूर्ण स्मारक उभारले. प्रत्यक्ष कुसुमाग्रजांच्या शुभहस्ते स्मारकाचे उदघाटन झाले. प्राप्तकाल कादंबरी वाचताना केशवसुत यांचे स्मरण होणे अपरिहार्य. ' प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा' तब्बल सव्वाशे वर्षांपूर्वीच्या या ओळी अर्थपूर्ण आहेत. लेखक-कवी मंडळींसाठी सुंदर लेणी म्हणजेच प्राप्तकालाचा साक्षेपी वेध घेऊन समाजमनाची निरीक्षणे, स्पंदने टिपण्याचा केलेला एक प्रयत्न. केशवसुत खरे तर द्रष्टे कवी. त्यांनी त्याकाळात स्पष्टच सांगितलं की अवघड काळात देखील सुंदर लेणी खोदा. प्रतिकूल परिस्थितीवर मात करा हा आशावाद त्यांनी प्रकट केला. प्राप्तकाल रेखाटताना मधुभाईंनी हाच आशावाद कादंबरीच्या शेवटी दर्शवला

आहे. वाचकहो. कादंबरी प्रत्यक्ष वाचण्याची उत्सुकता वाढली ना ? या महत्वाच्या कादंबरीचे कथाबीज थोडक्यात असे.

आवळसगाव. सह्याद्रीच्या पोटाशी विसावलेलं सिंधुदुर्ग जिल्ह्यातलं एक निसर्गरम्य गाव. आरस घराण्याच्या समाधी पुरुषाची समाधी, श्री लिंगेश्वराचं पुरातन देवालय, तिथली गर्द देवराई, मोरडोंगरी, तलाव आणि तिथे बागडणारे मोरांचे थवे हे गावचं वैभव. या निवांत गावात उज्वल भवितव्याची स्वप्नं पाहणारा प्रसाद आपल्या आईसमवेत राहतोय. प्रसाद पुण्याला एम ए पदवी घेऊन गावी परतल्यावर त्याच्या नजरेस तो सारा प्रकार दिसतो. गावातल्या काही नतद्रष्ट, स्वार्थी लोकांनी राईतल्या झाडांच्या निर्दयपणे कत्तली केलेल्या असतात. तो दाद मागतो. मात्र या भयंकर प्रकारात सरपंच, तलाठी, गावचे पुढारी, राजकारणी दलाल सारेच सामील असल्याने प्रसादचा आवाज विरून जातो. जाईला देखील हा प्रकार समजतो. अशाच वेळी आरस घराण्यातले एक उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणजे डॉ श्रीरंग आरस. ज्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले असते. भारतातले सर्वात श्रेष्ठ आणि ज्येष्ठ संशोधक डॉक्टर जे मुंबईला राहून व्रतस्थपणे प्रॅक्टिस करीत असतात त्यांची प्रकर्षाने आठवण प्रसादच्या आईला होते. तिला पक्की खात्री असते की तेच या प्रकरणात लक्ष घालतील, न्याय देतील. कारण डॉ श्रीरंग यांची देखील मोठी जमीन गावात असते जी स्वार्थी मंडळींनी बळकावलेली असते. कामाच्या व्यापामुळे कित्येक वर्षात ते गावी आलेले नसतात. पत्रव्यवहार होतो. ठरल्याप्रमाणे प्रसाद डॉ श्रीरंग आणि पत्नी डॉ अश्विनी यांना भेटायला जातो. प्रसाद एके ठिकाणी अस्वस्थ होऊन डॉ श्रीरंग यांनी सांगतो.

a

' आप्पा, कोणी अज्ञानी नाही इथं. सगळ्यांना सगळं कळतं, पण वळत नाही. कारण मनाचा कोतेपणा-क्षुद्रपणा. कुणाचं काही चांगलं बघवत नाही. माझी आईपण तुमच्याच मताची क्षमाशील आहे, पण माझे अनुभव फार वेगळे आहेत त्याबद्दल.'

डॉ श्रीरंग यांना मात्र तिथली परिस्थिती सुधारण्याबाबतची आशा असते. ते म्हणतात ' इथली मानसिकता बदलायला पाहिजे, इथली निगेटिव्हिटी जाऊन पॉझिटिव्हिटी आली पाहिजे. त्यासाठी निसर्ग अनुकूल आहे. आपण परिश्रम केले पाहिजेत.'

डॉ श्रीरंग आपल्या गावी आल्यावर त्यांना आपल्या जमिनीची, घराची, देवराईची दुर्दशा विषण्ण मनानं बघावी लागते. गावात सर्वत्र पोकलेन, जेसीबी, क्रशर आणि धूळ यांचेच साम्राज्य. अशा परिस्थितीत नानू या प्रामाणिक, भोळ्या गावकऱ्याची मदत सर्वांना होते. प्रसादकडून अनेक गोष्टींची ते माहिती घेतात. सरकारी दरबारी त्यांची उठबस असल्याने तिथल्या यंत्रणेला प्रथम ते जागं करतात. सूत्रं हलतात. वर्तमानात बातम्या आल्यावर सूत्र पटापट हलतात. दिल्लीपर्यंत प्रकरण जाते. कलेक्टर तर्फे प्रकरणाची गंभीरपणे दखल घेतली जाते. चौकश्या, झाडाझडती सुरु होते.

अनेकांचे मुखवटे गळून पडतात. कर्नाटकातला आणि सध्या कोकणपट्टीत काळेधंदे करून गावकऱ्यांना लुबाडणारा शामण्णा याप्रकरणात केंद्रस्थानी असतो. लाकूड तस्करी, जमिनी हडप करणे, अनधिकृत दगडखाणी तयार करणे, पैशांचा अपहार, भ्रष्टाचार यामध्ये तो आकंठ बुडालेला असतो. राजकारणी मंडळींमध्ये याची उठबस असल्यामुळे तो कुणालाच घाबरत नसतो.

a
हे प्रकरण आता आपल्यावर शेकणार असं समजताच तो मुकुंद आरस (माजी सरपंच) याला ताकीदच देतो. या पाताळयंत्री मुकुंदानेच स्वार्थापोटी या अण्णाला मदत केली असते. या संबंधितांच्या विरोधात शासन कायदेशीर कारवाई करायला सुरुवात करते. दुसरीकडे प्रसादवर जीव लावणारी जाई कधी पत्रातून तर कधी फोनवरून प्रसादशी संवाद साधत असते. तिला प्रसादला भेटण्याची इच्छा असते. मात्र प्रकरण थंडावल्यावर यावे असं ठरतं. आईला जाई आवडत असते. तिची मूक संमती देखील असते.

डॉ श्रीरंग मुंबईला जातात. तिकडे ऍक्ट तर्फे (आरस चॅरिटेबल ट्रस्ट) आळसगावी व्हिलेज डेव्हलपमेंट प्रोजेक्ट हाती घेण्याचं ठरवतात. प्राथमिक जबाबदारी मिलिंद आणि मोहिनीवर टाकण्याचं ठरवतात. डॉ श्रीरंग यांच्याकडे गावच्या जमिनीसंदर्भातली कोणतीही कागदपत्रं नसल्यामुळे त्या जमिनीचा कायदेशीर ताबा मिळण्यास अडचणी उद्भवतात. त्यामुळे प्रोजेक्ट मार्गी कसा लागणार हा यक्षप्रश्न उभा राहतो. त्यासाठी प्रसाद जमिनीची कागदपत्रे शोधू लागतो. यामध्ये भूदानासाठी केलेले बक्षिसपात्रचा कागद मिळणे महत्वाचा असतो. प्रसाद या कामासाठी मुंबईला जातो. त्याचवेळी नेमकी जाईची आई पुण्याहून प्रसादच्या गावी येते, आईला भेटते. तिथलं दारिद्र्य, प्रसादच्या घरची परिस्थिती बघितल्यावर जाईची आई तडकाफडकी निर्णय घेऊन जाईचे लग्न तिच्या मनाविरुद्ध एका श्रीमंताबरोबर लावून देते. जाई अमेरिकेला निघून जाते. याचा मोठा शॉक प्रसादला बसतो. तो उदास होतो. डॉ श्रीरंग त्याला सावरतात. आता गावचा विकास हाच तुझा ध्यास असे सांगतात.

a

ऍक्टचे सदस्य कोकणात दाखल होतात. गावातल्या नानूच्या लटपटींमुळे भूदानपत्राचा कागद अखेर श्रीधर भटजींकडे सापडतो. पाताळयंत्री मुकुंद आरसला समजताच तो कागद नानूकडून हस्तगत करण्याचं ठरवतो. प्रयत्न अयशस्वी होतो,. मात्र यात साधाभोळा नानूचा हकनाक जीव जातो. प्रसाद आणि त्याची आई हळहळते. त्या कागदाचे महत्व ओळखून तो कागद प्रसाद लागलीच डॉ श्रीरंगांकडे सुपूर्द करतो. या सर्व विचित्र अनुभवानंतर प्रसादच्या विचारसरणीत फरक पडतो. धर्माची व्याख्या त्याला नव्याने उमजू लागते.

प्रसाद म्हणतो ' लोकांना जातीधर्मात सतत अडकून ठेवणारे, स्वार्थ, भ्रष्ट्राचार आणि पैशांची हाव धरणारे राज्यकर्ते कधीच आवडत नाहीत. लोकांना सामान्य माणसाचे हित पाहणारे, लोकशाही सांभाळणारे प्रशासन हवे असते.'

गावातलं गलिच्छ राजकारण प्रसादने जवळून अनुभवलेलं असतं. विविध पक्ष संघटनांबद्दल, त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल त्याच्या मनात संभ्रम निर्माण होतो. मात्र प्रसादचा स्वतःच्या विचारशक्तीवर, अभ्यासावर विश्वास असतो. जमिनीचे मूळ कागदपत्र मिळाल्यावर जलद हालचाली वाढतात. जमीन ताब्यात घेऊन गावच्या विकास प्रकल्पाचा आराखडा काढून ऍक्ट कामाला लागते. या प्रवासात पर्यावरणाचे महत्व जाणणारी, आंबेडकरी विचारसरणीवर ठाम असणारी माया लोखंडे प्रसादला मोलाची साथ देते. दोघेही नकळतपणे एकमेकांच्या प्रेमात पडतात. गावकऱ्यांचा मात्र प्रसाद आणि मायाच्या लग्नाला विरोध असतो. डॉ श्रीरंग दोघांच्यामागे ठामपणे उभे राहतात. प्रकल्पाचा मुख्याधिकारी म्हणून प्रसादची नेमणूक केली जाते. १ मे रोजी या प्रकल्पाचा

शुभारंभ केला जातो. आणि चमत्कार घडतो. समाधीपुरुषाच्या राईमध्ये तोडलेल्या झाडांच्या खोडांना, बुंध्यांना पालवी फुटते, कोंब फुटतात. अंधाराचे साम्राज्य संपले आहे आणि उद्याची आश्वासक प्रसन्न सकाळ लवकरच उगवणार आहे असा संकेत तिथली पालवी जणू सर्वांना देत असते.

प्रोजेक्टचे काम सुरु होते. प्रसाद त्यात झोकून काम करू लागतो. त्याची विचारसरणी आता परिपक्व होऊ लागते. विविध प्रकारच्या मीटिंगमध्ये तो आपले विचार निर्भीडपणे व्यक्त करू लागतो. पृष्ठ तीनशे वरचे त्याने व्यक्त केलेले मौलिक विचार वाचून वाचक निःशब्द होतो. प्रसाद म्हणतो.

'हा देश सर्वधर्म, सर्वजाती, सर्वपंथ, गोरगरीब यांना जोडून घेत, सर्वसमावेशक राजकारण करील, यावर माझा विश्वास आहे. धर्माचे राजकारण करणारी विचारधारा सोडली, म्हणजे मी हिंदू धर्माचा त्याग केला असं होत नाही. पण माझा हिंदू धर्म गौतम बुद्ध, स्वामी विवेकानंद आणि महात्मा गांधी यांचा असेल.'

ट्रस्टच्या मिटिंगमध्ये डॉ श्रीरंग आपले मनोगत व्यक्त करताना प्राप्तकाल वर मौलिक भाष्य करतात. ते म्हणतात. 'आजचा प्राप्तकाल हा उद्याचा भूतकाळ आणि परवाचा भविष्यकाळ असतो, हे प्राचीन सूत्र आपणांस माहित आहे, पण प्राप्तकाल हा भूत आणि भविष्य यांना पोटात घेऊन सरकणारा एक अजस्र अजगर असतो.'

अशाच वेळी अवघ्या विश्वाला गिळंकृत करणाऱ्या करोनाचा शिरकाव होतो. सामाजिक, आर्थिक संदर्भ, समीकरणं बदलतात. माणुसकी हरवते. दुर्दैवानं डॉ श्रीरंग यांना या करोनाची लागण होते. यामधून ते सहीसलामत बाहेर

पडतात का ? प्रसादच्या गावातला प्रकल्प मार्गी लागतो का ? गुन्हेगारांना शासन होते का ? तसेच यापुढच्या काळातील राजकारण आणि समाजकारणाची दशा आणि दिशा नेमकी कशी असेल ? जातीधर्माच्या, अनिष्ट प्रथेच्या पलीकडे जाऊन निखळ माणुसकी जपणारे कोणी शिल्लक राहतील का ? अशा प्रकारे काही प्रश्नांची उत्तरं कादंबरीत मिळतील तर काहींची उत्तरं उद्याचा काळच देऊ शकेल. नाही का ?

या कादंबरीची दोनशे पानं लिहून झाल्यावर मधुभाई कोव्हिडच्या तडाख्यात सापडले. आयसीयू मध्ये असताना प्राप्तकाल पूर्णत्वास जाणार नाही असा विचारही त्यांच्या मनाला शिवला. मात्र दैवकृपेनं, प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर मधुभाई करोनाला हरवून घरी परतले आणि बहुचर्चित प्राप्तकाल कादंबरी पूर्णत्वास गेली. याचे श्रेय ते अर्थातच मॅजेस्टिकला देखील देतात. मॅजेस्टिक यांनी मधुभाईंची पहिली कादंबरी देवकी प्रकाशित केली आणि आता प्राप्तकाल ही कादंबरी देखील मॅजेस्टिकनेच प्रकाशित केली आहे. मधुभाई मनोगतात म्हणतात प्राप्तकाल कादंबरी माझी अखेरची. पण वाचक रसिकांना हे मान्य नाही. वयाच्या ९१ व्या वर्षी देखील त्यांचे लेखन जोमाने सुरूच आहे. प्राप्तकाल नंतर काय असेल याची उत्सुकता आम्हा वाचकांना आहेच.

३२९ पृष्ठांच्या कादंबरीत मधुभाईंनी अनेक व्यक्तिरेखांना जणू जिवंत केलं आहे. प्रसाद, त्याची आई, जुई, नानू, मुकुंद, डॉ श्रीरंग, डॉ अश्विनी, मिलिंद, माया, हे आपल्याशी सहजसुंदर संवाद साधतात. मधुभाईंनी या महाकादंबरीत बारीकसारीक तपशीलांवर, निरीक्षणांवर आणि स्वगतांवर जास्त जोर दिला आहे. तरीही दोन व्यक्तिरेखांमधला संघर्ष, ताणेबाणे लेखकाला अजून फुलवता

आले असते. तो संघर्ष इथे कमी दिसला. जो संघर्ष त्यांनी कातळ या कादंबरीत जोरकसपणे रेखाटला होता. असो.

शेवटी कुसुमाग्रजांच्या ओळी आपल्या ओठावर अलगद उमटतात. 'रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष : काल !' लवकरच तसा उष : काल होणार आहे. हा प्राप्तकाल मात्र कायम कधीच राहणार नाही अशा आश्वासक नोटवर कादंबरी आपला निरोप घेते.

(प्राप्तकाल (कादंबरी), लेखक: पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, प्रकाशक: मॅजेस्टिक प्रकाशन,मुंबई)

a

५२. ** काळाची गरज : र. धों. कर्वे समजून घेताना **



कुणि म्हणति मतलबी कीर्तिच मिळवी तोI
मतलबाविणें कधि कोण कार्य करतो II
सज्जनीं गुणांला दोषचि जे म्हणती I
शोभते तयाला सहज निंदा ती II
हे समजुनि जो जनकार्य शिरीं घेई I
अक्षया यशाते तोचि पात्र होई II

समाजस्वास्थ, एप्रिल १९३० या मासिकात प्रसिद्ध झालेली 'सज्जनाचे बक्षीस' ही कविता अनेक प्रश्नांवर, विषयांवर भाष्य करते. सज्जनांचे गुण जनसामान्यांच्या दोषास पात्र होतात हे त्यांच्या म्हणजे सज्जनांना शोभूनच दिसतात असा या कवितेचा मतितार्थ. ही कविता म्हणजे एक प्रकारे त्या महान व्यक्तीचे जणू आत्मचरित्रच ! ही कविता कोणी बरे लिहिली असेल ? त्या कवीचे नाव ?

गणिताचे प्राध्यापक असूनही संस्कृत, मराठी काव्य, अलंकारशास्त्र यावर जबरदस्त हुकूमत असणारे, समाजस्वास्थ्यासाठी संततिनियमन आणि लैंगिक शिक्षणासंबंधी प्रसंगी पदरमोड करीत तळमळीनं प्रत्यक्ष कार्य करणारे, हिंदुस्तानातील एक आद्य विचारवंत, बुद्धिप्रामाण्यावर विश्वास असणारे, आणि सगळ्यात महत्वाचं लोकशिक्षणाचा एक भाग, एक कर्तव्य म्हणून तब्बल

सव्वीस वर्षे 'समाजस्वास्थ' हे महत्वाचे मासिक चालवणारे एक द्रष्टे डॉ रघुनाथ धोंडो कर्वे (रधों) हे या कवितेचे जनक. रधोंचे विचार हे काळाच्या पलीकडचे होते. त्यांची भूमिकाही स्पष्ट होती. कुठल्याही देशाचे सामाजिक स्वास्थ हे निकोप स्त्रीपुरुषसंबंधावर अवलंबून असते. त्यासाठी लोकशिक्षण महत्वाचे आहे. संततिनियमनाचे महत्व, उपयुक्तता जनसामन्यांमध्ये रुजवणे ही काळाची गरज आहे. याचबरोबर जर आपले राष्ट्र स्वयंपूर्ण, कणखर आणि बलशाली बनवायचे असेल तर कुटुंब नियोजनाचा प्रभावी प्रसार देशभर होणे अत्यावश्यक आहे असे त्यांचे म्हणणे होते. या पवित्र कार्यासाठी रधोंनी आपले तन मन धन सारे सारे पणाला लावले होते. रधोंच्या या महान कार्यासाठी विविध पातळीवर त्याकाळी त्यांना तीव्र विरोध झाला. त्यांच्यावर खटले दाखल झाले. त्यांची आणि त्यांच्या कार्याची अवहेलना झाली, उपेक्षा झाली. तरी देखील होणाऱ्या परिणामाची त्यांनी कधीच फिकीर केली नाही. आपल्या कुटुंबापेक्षा आपल्या कार्याला त्यांनी प्राधान्य दिलं. आपल्या कार्याची आज नाही उद्या नक्कीच दखल घेतली जाईल याचा विश्वास त्यांना होता.

आज आपल्या देशापुढे प्रचंड वाढणाऱ्या लोकसंख्येच्या भस्मासुराची चिंता आहे. केवळ अफाट लोकसंख्येमुळे निर्माण झालेली विविध प्रकारची आव्हानं सर्वांसमोर आहेत. रधों १९५३ मध्ये निवर्तले. त्यावेळी भारताची लोकसंख्या ३६ कोटी इतकी होती आणि आज २०२३ मध्ये १४३ कोटी आहे. म्हणजेच गेल्या सत्तर वर्षात लोकसंख्या चक्क चौपटीने वाढलेली दिसते. खाणाऱ्या तोंडाच्या तुलनेत अन्नधान्याचे उत्पादन त्या प्रमाणात वाढले का ? गरिबीचे, अज्ञानाचे संपूर्ण उच्चाटन झाले का ? हाही एक संशोधनाचा विषय.

a
यावरून आपल्या मनाला एक प्रश्न पडतो की की आपण सर्वानीच रधोंचा आणि त्यांच्या, कार्याचा, विचारांचा चक्क पराभव तर नाही ना केला ? महाराष्ट्राला रधोंच्या कार्याची महती १९८० मध्ये झाली. आपलेच दुर्देव. रधोंना जाऊन आज सत्तर वर्षांचा कालावधी लोटला आहे. सत्तर वर्षापूर्वीचे त्यांचे क्रांतिकारी विचार आजच्या अस्थिर काळात किती मोलाचे, महत्वाचे आहेत याची प्रचिती आपल्याला येते. या साऱ्याचा विचार करूनच ' र धों कर्वे समजावून घेताना' हे एक महत्वाचे पुस्तक दाखल झाले आहे. त्याचे लेखक आहेत ज्येष्ठ संशोधक, समीक्षक, लेखक डॉ अनंत देशमुख.

र धों कर्वे या एकाच द्रष्ट्या व्यक्तिमत्वाचा अक्षरशः ध्यास घेऊन, आयुष्याची अर्धी वर्ष खर्ची करून देशमुख सरांनी रधोंच्या एकूण जीवनप्रवासावर, ऐतिहासिक कार्यावर एक नाही दोन नाही तर चक्क दहा पुस्तके लिहिली आहेत. रधों या विषयावरचे त्यांचे हे अकरावे पुस्तक. रधों हा डॉ देशमुख सरांच्या जगण्याचा जणू एक भाग बनला. त्यांचा श्वास बनला. २०१० च्या सुमारास रधों यांच्या जीवनप्रवासवर एकूण ८ खंड प्रकाशित झाले. ते पद्मगंधा प्रकाशनाने प्रसिद्ध केले. त्या अष्टखंडांचे विषय जाणून घेणे आवश्यक. असंग्रहित र. धों. कर्वे, बुद्धिप्रामाण्यवाद, मोपांसाच्या कथा, निवडक "शारदेची पत्रे ", र. धों. कर्वे : मते आणि मतांतरे, 'समाजस्वास्थ्य' कार, शेष समाजस्वास्थ्य, 'समाजस्वास्थ्य ' मधील निवडक लेख. इतकं डोंगराएवढं मौलिक लेखन करूनही लेखकाला 'र धों कर्वे समजावून घेताना' का लिहावेसे वाटले हेही समजून घेणं आवश्यक. त्याचे उत्तरही पुस्तकाच्या प्रारंभी लेखकाने दिले आहे. ते म्हणतात

' रधों यांचे 'समाजस्वास्थ' हे मासिक विलक्षण ज्ञानभांडार आहे. त्यांच्यावर लिहिताना माझा सारा रोख रधोंचे व्यक्तित्व समजून घेण्यावर राहिला आहे. समकालीन अभ्यासकांनीही हवे होते तेवढे लक्ष दिले नव्हते. रधों या विषयाचा मी जो ध्यास घेतला आणि त्यातून रधोंसंबंधी नवनवे पैलू वाचकांसमोर आणले तर ते त्याची यथोचित दखल घेतील'

एका विशिष्ट उद्देशाने, प्रेरणेने आणि लोकशिक्षणाच्या उदात्त हेतूने रधोंनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत 'समाजस्वास्थ' हे मासिक सव्वीस वर्ष चालवले (१५ जुलै १९२७ — १५ नोव्हेंबर १९५३). संपूर्ण समाजाच्या, व्यक्तींच्या हिताच्या दृष्टीनं त्या मौलिक माहितीचे प्रसारण विविध भाषांमधून भारतभर व्हावं अशीच रधोंची भूमिका होती. डॉ देशमुखांनी संशोधक, समीक्षक या नात्यानं पुन्हा एकवार 'समाजस्वास्थ' चे अंक बारकाईने अभ्यासून रधोंचे अलक्षित पैलू 'र धों कर्वे समजावून घेताना' या पुस्तकात उलगडून दाखवले आहेत. आजच्या काळात रधों पुन्हा प्रत्येकाने समजावून घेणं आवश्यक आहे हे मात्र खरं.

अनुक्रमाणिकेकडे नजर टाकल्यावर डॉ देशमुखांनी सदर पुस्तकातून एकूण ४४ विषयांमधून आणि ६ परिशिष्टांमधून रधोंच्या महान कार्याचा कॅनव्हास चिकित्सक रंगांनी रेखाटला आहे. यामध्ये महात्मा गांधी, शंकरराव किर्लोस्कर, डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, दुर्गा भागवत, रसेल आणि रॉबिन्सन, ज्ञानकोशकार राजवाडे अशा दिग्गज व्यक्तींसंबंधी रधोंनी आपल्या समाजस्वास्थ अंकांमध्ये त्यांच्याबद्दलचा आपला दृष्टिकोन, नातं, परखड मतं, निरीक्षणे, काही संदर्भ नोंदवले होते. अशी दुर्मिळ मौलिक माहिती

a

डॉ देशमुखांनी मोठ्या कष्टाने संकलित केली. त्याबद्दल काही. दुर्गाबाई भागवत हे रधोंना ओळखत. त्याकाळी रधोंच्या 'समाजस्वास्थ' या सप्टें. १९५२ च्या अंकात प्रत्यक्ष दुर्गाबाईंनी एक लेख लिहिला होता. त्याचा तपशील येथे वाचायला मिळतो. गणित हा विषय टिळकांचा आणि रधोंच्या जिव्हाळ्याचा विषय. टिळकांच्या विचारातील संततिनियमनाच्या संदर्भातील अंश रधोंना सुसंगत वाटल्यानेच समाजस्वास्थ च्या अंकात तो त्यांनी प्रसिद्ध केल्याचे लेखक सांगतात. गांधीजी १८१५ साली आणि रधों १९२६ साली आफ्रिकेतून भारतात परतले. गांधीजींच्या राजकारणाचा त्यांनी सूक्ष्म अभ्यासही केला. गांधीजींचे संततिनियमाविषयक विचार रधोंना अजिबात पटत नसत. रधोंच्यावर अश्लीलतेच्या आरोपाखाली पहिला खटला झाला तेव्हा रधोंनी आपले वकीलपत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिलं होतं. दोघांमध्ये तीव्र वैचारिक मतभेद होता मात्र दोघांची सामाजिक कार्यात झोकून देण्याची वृत्ती निरपेक्ष होती.

उर्वरित लेखांमधून म्हणजेच रधोंचे सामाजिक कार्य, समाजस्वास्थचा पहिला अंक, हे मासिक अश्लील का ठरले ?, बुद्धिप्रामाण्यवादी विचार, अनुवादक रघुनाथराव, लेखकांच्या मृत्यूविषयक नोंदी, अश्लीलतेच्या खटल्यासंबंधीचं लेखन, वाङ्मयस्पर्धामध्ये सहभाग, रधों : प्रकल्पकालीन पत्रव्यवहार आदी शीर्षकांमधून रधोंच्या कार्याची, त्यांच्या ध्यासाची, निरलस वृत्तीची ओळख वाचकाला नव्याने होते. त्यामुळे रधोंविषयीचा आपला आदर शतपटीने वृद्धिंगत होतो.

a

डॉ अनंत देशमुख यांनी समीक्षा, चरित्र, ललित, प्रवासवर्णन, संपादने, कथा, संशोधनात्मक अशा विविध साहित्यप्रकारात विपुल लेखन केले असून त्यांची आजवर एकूण सदतीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. काही पुस्तके प्रकाशनच्या वाटेवरती आहेत. अनेक महत्वाच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले आहे. १९७८ मध्ये सरांनी 'कुसुमावती देशपांडे यांच्या वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास' हा विषय निवडून पी.एचडी. संपादन केली. ठाण्याच्या अनघा प्रकाशनाने हे महत्वाचे पुस्तक प्रकाशित केले असून पुस्तकाची निर्मिती दर्जेदार झाली आहे. लोकसंख्येचा भस्मासुर दिवसेंदिवस प्रगतीला गिळंकृत करीत आहे. त्यावर तातडीनं उपाय योजना आखणे ही आज काळाची गरज आहे. शाळा कॉलेजमधून लैंगिक शिक्षण हा विषय अनिवार्य असावा अशी आजची परिस्थिती आहे. या सर्व पार्श्वभूमीवर डॉ देशमुख यांचे हे महत्वाचे पुस्तक समस्त वाचकरसिकांना, अभ्यासकांना, समाजाला दिशादर्शक ठरेल यात शंका नाही.

(र. धों. कर्वे समजून घेताना : लेखक : डॉ अनंत देशमुख, प्रकाशक : अनघा प्रकाशन, ठाणे)

a

५३. ** एक प्रयोगशील कादंबरी : चतुर **



हा तुझा माझ्यावर रोखलेला डोळा
कितवा ?
तिसरा ?
तुला हात-पाय-शरीर आहे का ?
मला ठाऊक नाही
पण तुला एक नव्हे असंख्य डोळे आहेत
काळ्याभोर असंख्य नजरा
पापण्या नसलेल्या
आणि तुझे हे सगळे डोळे पहिले नव्हेत,
दुसरेही नव्हेत
ते सगळे तिसरेच आहेत !

हा डोळा कोणी रोखलेला आहे ? अर्थातच मृत्यूनं. आपल्या हातात फार दिवस नाहीयेत तेव्हा जीवापाड काही कागदावर लिहावं असं त्याच्यातल्या लेखकाला मनोमन वाटतं. आणि त्यानंतर आपल्यासमोर उभं राहतं एक

विलक्षण, अद्भुत विश्व. या साऱ्या अस्वस्थतेला काय म्हणावं ? कविता, कथा, आत्मकथन, प्रवास वर्णन, ललित लेखन की कादंबरी ? सगळंच आपल्या आकलनाच्या पलीकडचं. वर वर सहज सोपं दिसणारं, प्रारंभी थोडं थोडं उमजणारं नंतर आपल्याला कवेत घेऊन कुस्करून टाकणारं काहीतरी आगळं, वेगळं, बेफाम, उत्कट, नवं आणि कोरं. यापूर्वी कधीही अशा फॉरमॅट मध्ये न वाचलेलं. तरुण लेखक प्रणव सखदेव यांची नवी कोरी प्रयोगशील कादंबरी : चतुर.

प्रारंभीची अर्पण पत्रिका मृत्यू आणि रमा यांना समर्पित केलेली तर डिस्क्लेमर मध्ये असं गूढात्मक लिहिलेलं. ' वाचकांनी या पुस्तकातील सर्व पात्रांचा संबंध लेखकाच्या जीवनाशी खोदून खोदून जोडून पाहावा ' इति लेखक.! तर थेट मागच्या blurb मध्ये सोपं सोपं लिहिलेलं. ' ही गोष्ट आहे तशी साधी- मरणाची....आठवणींची... प्रेमाची... बालपणाची... काडेपेटीत अडकलेल्या एका चतुराची...! '

तर या कादंबरीला प्रस्तावना लाभलीय ती कृष्णाजी शहाणे या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखकाची. प्रस्तावनेची सुरवातच वाचकाला अचंबित करणारी. ' माझ्या या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहून द्याल का' अशी विचारणा करण्यासाठी जेव्हा सदरहू पुस्तकाचा लेखक, प्रणव सखदेव माझ्याकडे आला, तेव्हा खरंतर मला त्याला प्रस्तावना लिहून द्यायची अजिबात इच्छा नव्हती ! '

अखेर शहाणे प्रस्तावना पूर्ण करतात. शेवटी ते म्हणतात ' हे जे काही कथन आहे, त्यामधून मृत्यू आपल्याला सारखा भेटत राहतो आणि निरागसपणा

हरवत जाणं अशी एक संकल्पनाही वारंवार समोर येते. ईश्वर प्रणवच्या आत्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना करतो आणि थांबतो !'

खरं तर तरुण लेखक प्रणव सखदेव कादंबरीकार हा अलिप्त नाहीच आहे तर तो या कादंबरीत पानापानांमध्ये कधीकाळी भोगलेले, जगलेले एकेक क्षण जिवंत ठेवून आपल्या आसपास वावरतो आहे, संवाद साधतो आहे ही कल्पनाच मुळी भारी आणि सॉलिड. अशा प्रकारचा प्रयोग अन्य कुणी लेखकानं केला असावा असं मलातरी वाटत नाही. एकेक पान अनुभवताना माझ्यासारखा वाचक बुचकळ्यात. हे काहीतरी अफाट आहे याची कल्पना एव्हाना आपल्याला येते आणि प्रणव यांनी उभ्या केलेल्या सहज सोप्या शब्दशैलीच्या गूढ अशा साम्राज्यात आपण अलगद सापडतो आणि वावटळीसारखे फिरत राहतो. यातून मुक्ती नाहीच. काडेपेटीत बंदिस्त केलेल्या त्या निष्पाप चतुरासारखी आपलीही अवस्था होते. चतुर..येस.. चतुर !

आठवा आपलं लहानपण. मैदानावर खेळताना 'चतुर' या सर्वांगसुंदर इवल्याशा प्राण्याशी अनेकांचा संबंध आला असेलच. थेट हेलिकॉप्टर सारखा उडणारा. मानवाने त्याच्या अंगकाठीचा अभ्यास करून हेलिकॉप्टर बनवले असणार. पुढेमागे या पेटीत खजिना मिळू शकेल या आशेवर मुलं त्या बिचाऱ्या चतुराला काडेपेटीत बंदिस्त करून ठेवायचे. पुढे तो सुंदर, लोभस चतुर काडेपेटीत गुदमरून मरूनही जायचा. या कादंबरीचे शीर्षकच 'चतुर' आहे. या कादंबरीचा नायक 'मृत्यू ' आहे. त्याच्या आयुष्यात आलेली 'रमा' ही नायिका आहे. या जगात जगत असताना विविध पातळ्यांवर माणसाचा मृत्यू होतच असतो. कधी तो अकल्पित तर कधी जाणून बुजून.

a

कादंबरीचा प्रारंभ, माध्यान्ह आणि उत्तरार्ध कधी कथारूपानं, कवितेनं तर कधी आत्मकथनानं, आत्मचिंतनानं सजला आहे. ढोबळपणे या कादंबरीचं परीक्षण करणं तितकंच जिकीरीचं आणि जबाबदारीचं देखील. एकशे सत्तेचाळीस पानांमध्ये काही चिंतनात्मक ओळींमधून कादंबरीचं विश्व वाचकाला उमजू लागतं. पृष्ठ :८३ मध्ये लिहिलंय ' पुस्तकं आपल्याला माणसं, निसर्ग असं काय काय वाचावं हे सांगत असतात. म्हणून पुस्तकाचं अंतिम ध्येय पुस्तकातून बाहेर पडायला लावणं हे आहे असं मला कायम वाटतं. पुस्तकातून आपल्याला शिकायचं असतं, आपण जे जगतो ते समजून घेणं म्हणजे आजूबाजूची माणसं, त्याचं वागणं, निसर्ग !' हे विधान आजच्या वाचकांसाठी मौलिक. अर्थात उमजायला आपल्याला वेळ लागतोच. आयुष्यातलं खरंखुरं जगणं, त्याचे बारीकसारीक तपशील, भिजलेल्या आठवणी, हुरहूर लावणारे क्षण, सारं सारं वैभव प्रणव यांनी कादंबरीत साकारलं आहे. ज्या क्षणी माणसाला मृत्यू समोर दिसतो त्या क्षणापासून जगण्यातली निरागसता संपुष्टात येते. आधुनिक तंत्रज्ञानाचे आजचे अनेक संदर्भ कादंबरीत ठिकठिकाणी आपल्याला दिसतात. वर्ड फाईल, पेन ड्राईव्ह, हिडन फाईल्स, न्यूरोथिऑलॉजी, वगैरे. या सर्वांना घेऊन कथा, कविता, ललित फॉर्मॅटमधून प्रणव यांनी या कादंबरीत केलेला हा एक वेगळाच प्रयोग आहे. वाचक या प्रयोगाचे स्वागत नक्कीच करतील.

साहित्य अकादमी युवा पुरस्कार विजेता प्रणव सखदेव यांची ही सहावी कलाकृती. या अगोदर प्रणव यांच्या अनेक कविता, कथा विविध नियतकालिकातून मी वाचलेल्या, त्यानंतर '९६ मेट्रोमॉल' ही त्यांची कादंबरी

a

वाचलेली. आणि आता ही 'चतुर' कादंबरी. प्रणव यांचा जास्त ओढा फिक्शन स्वरूपाच्या लेखनाकडे. तरीही त्यात माणसाच्या मनोव्यापाराचे प्रभावी चित्रण, पौराणिक कथांचे संदर्भ, संदिग्धता आणि प्रयोगशीलता जाणवते. ख्यातनाम चित्रकार अन्वर हुसेन यांचे मुखपृष्ठ पुरेसे बोलके आहे. काड्यापेटीतली, आजूबाजूची गुलाबी रंगाची गुंतवळ, आणि कोषातून बाहेर पडलेला, फुलांवर स्वच्छंद विहार करणारा शुभ्र चतुर. हुसेन यांच्याही प्रतिभेला आपण नकळत सलाम ठोकतो. रोहन प्रकाशनची ही आगळीवेगळी साहित्यकृती साहित्यविश्वात आणि लेखन मांडणीत एक वेगळाच प्रयोग करणारी ठरेल यात शंकाच नाही.

(चतुर..कादंबरी :लेखक:प्रणव सखदेव, प्रकाशक : रोहन प्रकाशन,पुणे)

a

५४. ** अस्वस्थ काळाच्या नोंदी **



जीव मुठीत धरून शहरं सोडून निघून जाताहेत माणसांचे लोंढेच्या लोंढे

लॉकडाऊन सुरु आहे सारीकडे

अंगणात उतरतात कबुतरे तुकारामाच्या अभंगातल्या शब्दांसारखी

दाणे वेचत रहातात

a

मनात तुकारामाच्या अभंगातला आकांत घेवून
मी बसून आहे खिडकीत.. ऊन उतरते आहे सावकाश
सावल्या तिरक्या होत पायऱ्यांपाशी आल्या आहेत
उडून गेलीत कबुतरे दूर कुठेतरी !

अवघ्या विश्वाला गिळून टाकणारा, आयुष्याची सारी गणितं, संदर्भ, स्वप्नं, आकांक्षा खुंटीवर टांगणारा आणि एकांताच्या कोषात ढकलून मृत्यूच्या आकड्यांचे भय सतत दाखवणाऱ्या करोना नामक विषाणूचा महाप्रचंड धसका आपण २०२०-२१ मध्ये साऱ्यांनीच अनुभवलेला. सारेच बंदिस्त झाले. खिडकीच्या बाहेर दिसणारी भेसूर दृश्ये, चॅनलवर अहोरात्र चालणाऱ्या निगेटिव्ह बातम्यांचा महापूर, त्यातही चालणारे गलिच्छ राजकारण. त्यावेळी खिडकीत बसलेल्या एखाद्या संवेदनशील कवी मनाला किती यातना झाल्या असतील याची आपण कल्पनाच केलेली बरी. खिडकीबाहेरची अस्वस्थता कागदावर टिपणाऱ्या त्या कवीच्या कविता मी वाचत होतो आणि स्वतः अस्वस्थ होत होतो.

जत्थ्याजत्थ्याने जाताहेत
डोक्यावर खुडबुड बिऱ्हाड घेऊन
पाठीवर फाटकी सॅक लादून
थकलेल्या चेहऱ्याने अनवाणी
भीतीचे सावट पांघरून पाय ओढत चालले आहेत
ते कोण लोक आहेत...

हीच ती अस्वस्थ करणारी कविता. कविता दीर्घ आहे. पूर्ण इथं देणं केवळ अशक्य. मात्र त्यातला आशय अंगावर झेपावणारा आहे. माझ्या घराच्या पश्चिमेस पसरला आहे मुंबई-आग्रा एक्सप्रेस हायवे. करोनाच्या काळात त्यावरून रात्री अपरात्री जीव वाचवण्यासाठी आणि पोट भरण्यासाठी मैलोनमैल पायी चाललेला मजुरांचा तांडा मी डोळ्यांनी बघितलेला आहे.

बायका-पोरांचे श्वास गहाण टाकून
जगण्याचे लचांड पाठीवर लादून चालले आहेत
ते कोण लोक आहेत.

आणि बरोबर तीन वर्षानं २०२३ मध्ये 'ते कोण लोक आहेत' याच शीर्षकाचा नवीन कोरा कविता संग्रह हाती आला आणि मला तो पुन्हा भयकाळ स्मरला. कवी पांडुरंग सुतार यांचा हा तिसरा कविता संग्रह. पाचोरा तालुक्यातील डोंगरगाव हे कवीचं जन्मस्थळ. यापूर्वी 'कपाळावर कोरलेले कवितेचे जखमी सूर्य (१९९५)' आणि 'दगडी खांबांचे आकाश- (२०१७) हे संग्रह प्रकाशित झालेले. गेली चार दशके कवी कविता लिहीत आहे. हिंदी, इंग्रजी साहित्याचा दांडगा अभ्यास. चतुरस्त्र वाचन. 'दगडी खांबांचे आकाश' हा संग्रह वाचण्यापूर्वी स्वतः कवीने कवितेच्या निर्मिती संदर्भातल्या काही नोंदी, निरीक्षणे चिंतनात्मक पद्धतीनं त्यात रेखाटली आहेत. कविकुळातील समस्त कवी, विद्यार्थी, समीक्षक, प्राध्यापक सर्वांनीच ही १९ अक्षरलेणी मुळातून वाचली पाहिजेत. एके ठिकाणी कवी लिहितो : ' कवितेला जाणून घेण्यासाठी

आपल्याला आपल्या ज्ञानाची गृहीते जशी पणाला लावावी लागतात तसेच अंतःकरणाचे द्वारही खुले ठेवावे लागते. अंतःकरणाचे साद घालणे मात्र आपसूक असावे लागते.' किती सुंदर ! इस्त्रायल-पॅलेस्टिन युद्धज्वराच्या भयावह बातम्या आणि व्हिडिओज आपण टीव्हीवर सध्या रोज बघत आहोत. केवळ चार ओळीत कवी पांडुरंग सुतार यांनी युद्धातले जळजळीत वास्तव शब्दांमध्ये कसं टिपलं आहे पहा.

विजयी होतील कुणीतरी आणि कुणीतरी पराजीत
पण सारीच अंगणे उजाड झालेली असतील
एक नंतर दोन, आणि त्यानंतर कित्येक
मांडू शकणार नाही कुणीच युद्धात कामी आलेल्यांचा आलेख....

आणि ही कविता पहा :

दररोज कोणत्या ना कोणत्या भाषेत कितीतरी पक्षी मरतात
आणि युद्धात वा अशीतशीही माणसे मरतात
कवितेत कवी मरतात आणि कविता युद्धातही मरत नाही....

वाचक जणू निःशब्द होतो. धर्मसत्तेच्या कैफामुळे आणि काही नेत्यांच्या महत्वाकांक्षेमुळे युद्धाला तोंड फुटलंय. मात्र यामध्ये सामान्य माणूस हकनाक मारला जातो. या सर्व धामधुमीत टिकून राहते फक्त कविता ! मुंबई ! आमची

मुंबई ! ! या शीर्षकांतर्गत १७ शब्दचित्रे रेखाटली आहेत. ती सगळीच प्रत्ययकारी आहेत. उदा.

मुंबई म्हणजे लाल रंगवलेल्या ओठातून दिसणारे
हसत असलेल्या हिजड्यांचे पांढरेशुभ्र दात

'पाठ फिरवून गेलेले लोक', 'आतल्या आत कुजबुजत असलेले लोक', आणि 'तळघरात मूक बसून असलेले लोक' या शीर्षकांतर्गत एकूण ४७ कविता आपले अनुभवविश्व समृद्ध करतात. व्हिन्सेंट व्हॅनगॉग या जगप्रसिद्ध चित्रकाराचे न लिहिलेले पत्र मुळातून वाचण्यासारखे. 'तुकारामा' कवितेच्या सात तुकड्यातुन साधलेला संवाद आपल्याला अंतर्मुख करतो. 'मी चाललोय त्यांच्यासोबत, कधी आगेमागे... ते गात असलेला दुःखाचा अभंग ऐकत' काळजाला भिडणारे शब्द. अजिंठा कवितेतून पाषाणशिल्पातले कारुण्य कवीने उलगडून दाखवले आहे. 'पुस्तकांच्या संदर्भात' कवितेत ' पुस्तके जपायला हवीत, जुनी झाल्यानंतर तर अधिकच..ही ओळ मनावर ठसते. कवितेच्या किनाऱ्यावर पहुडलेल्या परंतु मनाला ठसठणाऱ्या अशा अनेक ओळी इथं केवळ शब्दमर्यादेमुळे देता येणं शक्य नाही.

कवी पांडुरंग सुतार यांची शब्दशैली प्रभावी, प्रवाहित, नितळ आणि तपशीलपूर्ण आहे. विविध प्रतिमांतून, प्रतीकातून कवीने उभारलेलं अनुभवविश्व आपल्याला थक्क करतं. टोकदार सामाजिक भान हे या संग्रहाचे बलस्थान आहे. कवीला कोणत्याच विषयाचे बंधन नाही. कवीला अलंकृत भाषेचा सोस नाही. जे काळजात उमटलं ते त्यांनी मुक्तछंदात सहजपणे कागदावर प्रभावीपणे

a

उतरवलं आहे. एक खूप आतली आणि सच्ची कविता वाचल्याचे समाधान वाचकाला नक्कीच मिळते. पृष्ठ ११३ वरची कविता. त्यातल्या शेवटच्या ओळी

कवितेतील इवल्या अक्षरांना दूर लोटणारी
मरणाची भीती उरात धरून गारद्यांच्या गर्दीत अदृश्य होणारी.
ही कोणती वेळ ? कोणती वेळ ही ? कवितेला जागच नाही !

यावर आपण काय बोलावं आणि कसं बोलावं ? अत्युच्च प्रतिभाशक्तीचं वरदान कवीला लाभलं आहे. कवी उदारहस्ताने आपलं अनुभवविश्व आपल्या पदरात टाकत आहे. आपण कुठेतरी कमी पडतोय असा भास प्रत्येक कविता वाचताना वाचकाला होतोच. 'वर्णमुद्रा पब्लिशर्स' या नामांकित प्रकाशन संस्थेनं या कविता संग्रहाची निर्मिती निगुतीनं केली आहे. मुखपृष्ठ, मांडणी आणि बांधणी सारंच दर्जेदार. कवी पांडुरंग सुतार यांच्या पुढील लेखन प्रवासास शुभेच्छा देऊन तूर्तास थांबतो.

(ते कोण लोक आहेत (कवितासंग्रह) :कवी : पांडुरंग सुतार, प्रकाशक : वर्णमुद्रा पब्लिशर्स, शेगाव.)

a

५५. ** अरण्येश्वरी : एक मुक्त चिंतनिका **



वनदेवी राखतसे पर्यावरणाचा तोल
हालचाल निसर्गाची परिणाम करीतसे खोल
नानाविध वनस्पती इथं रानावनात दिसती
तळी अन सरोवरे महाजलाने पूर्ण भरती
जलास भय अग्नीचे अन अग्नीस भय जलाचे
मृत्यूसमोर पाहून, वाढे सामर्थ्य हतबलाचे
होती उतावीळ लतावेली, सभोती फुलेही साक्षी
चमकती हिरवी भूषणे संवर्धनाच्या गवाक्षी !

वृक्षसंवर्धनाचे आणि पर्यावरणाचे महत्व शेकडो वर्षांपूर्वी आपल्या ऋषीमुनींनी, पूर्वजांनी, संतमहंतांनी आपल्या लेखनातून, निरूपणातून दाखवलं आहेच. त्यांनी लोकांना कधी देवाची भीती घालून तर कधी विज्ञानाचे महत्व सांगून देवराया वाचवल्या आहेत. त्यांचे अनंत उपकार आपल्यावर आहेतच. इंग्रजांनी देखील विविध प्रांतातली वने राखून, वाचवून पुढे ती संरक्षित केली आहेत. आपल्या जवळचेच एक उत्तम उदाहरण द्यायचे म्हणजे ठाणे-मुंबई या महानगरांना अक्षरशः चिकटून बसलेलं २०.२६ चौरस किमी क्षेत्रफळ असलेलं संजय गांधी राष्ट्रीय उद्यान. विविध वृक्षवेलींनी बहरलेलं आणि जैवविविधतेने नटलेलं हे जंगल म्हणजे मुंबई-ठाणे शहराचे जणू फुफ्फुस आहे. ताज्या, शुद्ध प्राणवायूचा पुरवठा हे जंगल आपल्याला अजूनही करीत आहे. ग्लोबल वॉर्मिंगच्या निमित्ताने झाडे लावा, जंगले टिकवा या महामंत्राचे स्मरण करणे आणि त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे.

अशाच पार्श्वभूमीवर ठाण्यातले लेखक,कवी, निरुपणकार, व्याख्याते श्री अरविंद दोडे यांचे नुकतेच प्रकाशित झालेलं 'अरण्येश्वरी' हे सुंदर, आगळंवेगळं पुस्तक वाचनात आले. श्री दोडे यांची आजवर चाळीसच्या वर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अनेक महत्वाच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं आहे. सुरवातीस उद्धृत केलेल्या काव्यपंक्ती त्यांच्याच. 'अरण्येश्वरी' हे एक मुक्त चिंतन आहे. 'सहा ऋतूंचे सहा सोहळे येथे भान हरावे' या सुंदर काव्यपंक्तीची प्रचिती आपल्याला या पुस्तकाच्या पानोपानी अनुभवायला मिळते. इथे वसंतातली प्रसन्नता आहे, ग्रीष्मातली आग, शुष्कता,

शून्यता आहे, शरदाचे थंडगार चांदणे आहे, हेमंतातली हिमवादळे आहेत, शिशिरातली जीवघेणी पानगळ आहे तर वर्षा ऋतूतला घनघोर पाऊस आहे. विविध ऋतूंच्या रंगांचा ,त्यांच्या नखरेल, लहरी स्वभावाचा आणि अनुभूतीचा कॅनव्हास अरविंद दोडे यांनी शब्दरूपाने समर्थपणे रंगवला आहे. हा अरण्येश्वरीचा समृद्ध कॅनव्हास पूर्वरंग आणि उत्तररंग विभागातील एकूण चोवीस कथारूपी, काव्यमय शैलीत साकारला आहे, सजला आहे. अनेक देशी, विदेशी लेखकांच्या संदर्भग्रंथांचे तसेच भारतीय प्राचीन परंपरेचे दाखले लेखकाने दिल्याने एक परिपूर्ण पुस्तक वाचल्याचे समाधान वाचकाला मिळते. हे संपूर्ण पुस्तक वाचण्यापूर्वी लेखकाचे निवेदन जाणून घेणं आवश्यक ठरतं. लेखक म्हणतो. ' मनाचं दुजेपण घालविण्याचा सुगंधी मार्ग म्हणजे अरण्य-वाचन. अज्ञाताशी एकरूप होण्याची विद्या म्हणजे वनविद्या. विश्वात्मक देवाचा अनुभव घेताना वृक्षात्मक देवाची प्रचिती येतेच. विश्वाचे आर्त मनी प्रकटायला वेळ लागत नाही , फक्त निसर्गाची उत्कट ओढ वाटायला हवी.'

अरण्यस्तुती, ऋतुकौतुक, अरण्यसूक्त, करुणाष्टक, भूपाळी वनदेवीची अशा काव्यपंक्तीतून, दशपदीतून प्रथम समृद्ध वनराईचे अभिरूप दर्शन घडवले जाते. ' रानीवनी मधुबनी, जन्मभरी फिरलो एकला, तुझिया दर्शना वनदेवी, माथा चरणी ठेविला' या करुणाष्टकातून लेखक-कवी वनदेवीपाशी आपलं मागणं मांडतो, दुःख सांगतो. पुढे गोष्टीरूप लेखांमध्ये आपण गुंतून जातो. आकाशगंगेत स्नान करण्याची अभिनव कल्पना सुखावणारी आहे. 'उरे रिक्त मन' या पहिल्याच गोष्टीरूप लेखात गोष्टीतला नायक एका भुताच्या बेटावर जातो. तेथून परतण्याचा मार्ग नसतोच. तो पोहत बेटावर जाण्याचा ठरवत असतानाच एक

सुंदर, सजवलेली होडी किनाऱ्यापाशी येते. होडीला एक गूढ कंदील लटकत असतो. होडीत नावाडीही नसतो. तो होडी त्याला बेटावर घेऊन जाते. भुतांच्या कल्पनेनं तो गर्भगळीत होतो. आता होडी बेटाच्या गुहेत शिरते. त्याचवेळी तिथे त्याचं स्वागत करायला कोण आलं असतं ? पुढे त्या नायकाचं काय होतं ? ती होडी कुठे जाते ? अशी उत्कंठा वाढवणारी अभिजात शब्दशैली लेखकापाशी असल्याने वाचक रसिक त्या कथेत गुंतून जातो. लवणाच्या सावल्या मधला वनदूत म्हणतो' आत्महत्या करणं सोपं नसतं. जे प्रेम करतात, ते जीव देत नाहीत अन जीव घेत नाहीत. मूकपणे प्रेमानं ते प्रेमात रंगून जगत राहतात.' आत्ताच्या प्रेमातुर तरुणांना हा एक संदेशच आहे. 'चंद्र देतसे प्रसाद' या गोष्टीरूपात भूमी म्हणते ' मरण म्हणजे दुःखद घटना नाही. सत्यस्वरूपाचा तो एक थांबा आहे. मृत्यू म्हणजे आईकडे परत जाणं.' किती सहजसुंदर. आयुष्याच्या वाटेवर भरकटताना मार्गदर्शक, आपले मन आणि पंचप्राण हेच श्रेष्ठ ठरतात. 'एकरूप होता होता' यामध्ये पृथ्वीची सहनशीलता, अग्नीची पवित्रता, चंद्राची शीतलता, कबुतरांची अलिप्तता, अजगराची निर्भयता, सागराची परोपकारता, वेश्येची तटस्थता, बालकाची निरासगता अशी दत्तप्रमाणे प्रत्येक गोष्टीपासून काही शिकायची इच्छा असेल तर आपणही गुरु होऊ शकतो हे महत्वाचं त्यात सांगितलं आहे.

एकूण चोवीस लेखांत अंधश्रद्धेचा जराही अंश नाही तर विज्ञान विचारांचा पदर धरून लेखक-कवी समृद्ध अरण्याचे विराट रूप दाखवतो. प्रारंभी आपल्याला या पुराणकथा भासतात मात्र त्यांना आजच्या आधुनिक विचाराची भक्कम जोड असल्याने वाचक भारावून जातो. निसर्गवर्णनाची विलोभनीय

चित्ररुपे, ओघवती सहजसुंदर शब्दकळा, काव्यमय सुसंस्कारित भाषा, विचारांचा कसदार मागोवा या सर्वांमुळे हे पुस्तक वाचनीय झालं आहे. ओघवत्या मराठी भाषेत इंग्रजी शब्दांचा अजिबात वापर केलेला नाही तसेच आजच्या काळातील टेक्निकल गोष्टींचा संदर्भही त्यात नाहीत. हे एक वैशिष्ट्य.

ही एक सुंदर अरण्यगाथा आहे. अवघ्या मानवजातीच्या कल्याणासाठी, समृद्धीसाठी जंगलाचा विकास हाच एकमेव पर्याय आपल्यापुढे उभा आहे. हे पुस्तक माणूस, निसर्ग आणि पर्यावरण यांचे अद्वैत नातं अधोरेखित करतं. संधीकाल प्रकाशन यांनी हे मौलिक पुस्तक प्रकाशित केले आहे. पुस्तकाची निर्मिती, सजावट, मांडणी उत्कृष्ट आहे. सांगता करताना कवी ग्रेस यांची सुंदर ओळ स्मरते आहे.

झाडांशी निजलो आपण

झाडात पुन्हा उगवाया !

(अरण्येश्वरी, लेखक : श्री अरविंद दोडे, प्रकाशक : संधिकाल प्रकाशन, भाईंदर, ठाणे)

५६. ** एक संयत,सूचक अंत:स्वर **



कालपरवापर्यंत तू मला माहीत नव्हतास
तरी आज का उदास वाटतंय तुझ्याशिवाय ?

कपड्यातला एखादा तुकडा काढून टाकला
आणि तिथं दुसरा कपडा लावला बेमालूम
तर सौंदर्यच वाढतं कपड्याचं !
तू भेटल्यापासून ते तू सोडून जाईपर्यंतच्या

काळाच्या पोकळीत नेमकं काय भरता येईल ?,
विचार करतेय.

माझं अस्तित्व विखुरल्यानंतरही
न भरून येणारी पोकळी आहे काळाची
तुझ्या-माझ्या आतल्या जाणिवांची-नेणिवांची !

'उमलावे आतुनीच' या कविता संग्रहातली ही कविता संपूर्ण संग्रहातल्या कवितांचे जणू सार, मर्म आहे. कवयित्रीच्या मनात उठणाऱ्या भावभावनांचे ते एक प्रतीकात्मक रूप आहे असं मला वाटतं. गतकाळात निसटून गेलेल्या आठवणींच्या, हुरहूर लावणाऱ्या अनेक क्षणांच्या पदराचे टोक अजूनही तिने घट्ट पकडून ठेवलं आहे. आठवणींच्या काठावर शांतपणे बसून ती मनात उठणाऱ्या सूक्ष्म हेलकाव्यांचे, तरंगांचे ती अवलोकन करत आहे, अल्पाक्षरांचा आधार घेऊन ती रेखाटत आहे कागदावर बेरीज-वजाबाकीचा तरल कोलाज. तिन्हीसांजेस भरून आलेली ही उदासी, खिन्नता, न कळतपणे कवयित्रीच्या काळजात उमलत जाते तिच्या उच्छवासासह !

तो वेड्यासारखा काढत राहतो चित्रं.
त्याच्या रेषा अधिकाधिक गडद,
नको त्याजागी कागदावर.

जाणवतो त्याने,

दाबून टाकलेला अस्वस्थ हुंदका.

आजपर्यंत सर्वच साहित्य प्रकारात सकस लेखन केलेल्या कवयित्री प्रा.प्रतिभा सराफ यांचा हा तिसरा कविता संग्रह तब्बल एक तपानंतर रसिकांच्या समोर आला आहे. त्यांचे हे नववे पुस्तक. त्या उत्कृष्ट गजलकारही आहेत. एकूण ९९ कवितांमधून प्रतिभाताई रसिकांशी संवाद साधतात. कवितेमधून कधी त्या जगण्याचा अवकाश, गतकाळाची मनोगते, निरीक्षणे तर कधी त्या आयुष्याबद्दलचे मुक्तचिंतन मांडतात. कुठेही शब्दांची ओढाताण नाही, अलंकाराचा सोस नाही की जडजंजाळ शब्दांची कृत्रिम पेरणी देखील नाही. प्रतिभाताईंची कविता ही साधी सुधी, सच्ची, समंजस, आणि प्रगल्भ अशी आहे. 'काही नोंदी : अशाही...तशाही' या शीर्षकांतर्गत सात कवितांमधून प्रतिभाताई मनातल्या खोल डोहातली खळबळ शब्दांच्या रूपानं अलगद आपल्यासमोर उलगडतात. अगदी सहजपणे आणि प्रभावीपणे.

तुझ्या असीम दुःखाला कुशीत घेऊन तुझ्यावर सुखाचा वर्षाव करणारी !

दमछाक करणाऱ्या ओझ्याला छाती फुटेस्तोवर दाबून ठेवणारी !

आणि एक कविता माझ्यासाठी

तुझ्या कोऱ्या कागदावरची.

a

एकही ओळ न वाचताही प्रेयसीसम समजून घेणारी !

अनेक कवितांमध्ये एकाकीपणाची स्वगतं आहेत. जी कवयित्रीने स्वतः अनुभवलेली आहेत. समाजातील सर्वच स्तरात वावरताना, अनेक व्यवधानांना तोंड देताना विविध टप्प्यांवर कवयित्रीला अनेक नजरांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना तोंड द्यावे लागते. त्याची उत्तरे तिच्याकडे असतातच. मात्र ती त्या त्या वेळेला त्यांना चोखपणे देते. या प्रश्नांच्या मालिका आपल्याला संग्रहात ठिकठिकाणी दिसतातही. आत्तापर्यन्त अनेक कवयित्रींनीं स्त्रीवादी कविता लिहिल्या आहेत,लिहीत आहेत. मात्र प्रतिभाताईंची ही कविता खूप वेगळी आहे. यामध्ये आक्रस्ताळेपणा, बंडखोरी भाषेचा लवलेशही नाही. तर एक मूक आक्रंदन आहे. समंजस सोशिकपणा आहे. तरीही ती दुःखाला कवटाळून बसलेली नाही, की झुकलेली नाही, तर दुःख सोसून पुन्हा जिद्दीने उभी राहणारी आजची स्त्री आहे हे महत्वाचे आहे. एखाद्या जुन्या अल्बमची पानं आपण सावकाश पालटत आहोत आणि त्यामध्ये समरस होत आहोत असे फिलिंग हा संग्रह वाचताना वाचकाला जाणवते. पिना, फ्रेंडशिप बँड, संसार, मुक्ती, खरंच ?, काळोख, उंबरा, स्वप्न, कविते तू, नकोशा गोष्टी अशा अनेक कवितांमधून प्रतिभाताई आपल्याशी संवाद साधतात, मनातलं सारं कागदावर सहजपणे रितं करतात.

ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांची दीर्घ प्रस्तावना या संग्रहाला लाभली आहे आहे. एकेठिकाणी ते म्हणतात ' प्रतिभा सराफ यांनी या संपूर्ण संग्रहात,

कवितेतली 'ती' आणि 'मी' वेगळी अशी भूमिका घेतलेली नाही. आणि हाच मोकळेपणा अत्यंत पारदर्शीपणे कवितेत उतरला आहे.' कवयित्री प्रतिभाताई आपल्या मनोगतातून संवाद साधतात ' कोऱ्या आणि ओल्या पाटीवर कवितेचे पहिले अक्षर गिरवले अगदी तेव्हापासून मिळालेल्या प्रोत्साहनामुळेच हात सदैव लिहिता राहिला.'

ग्रंथालीसारख्या दर्जेदार प्रकाशन संस्थेने या संग्रहाची निर्मिती तितकीच देखणी केली आहे. निकिता सराफ या प्रतिभाताईंच्या कन्येने आतल्या ऐवजाला साजेल असे चित्र मुखपृष्ठासाठी रेखाटले आहे. प्रतिभाताईंनी कसोशीने जपलेला संयत, सूचक अंतःस्वर या संग्रहाच्या निमित्ताने वाचकांनी पुन्हा पुन्हा अनुभवायला हवा.

(उमलावे आतुनीच (कवितासंग्रह), कवयित्री, प्रा. प्रतिभा सराफ, प्रकाशक : ग्रंथाली, मुंबई.)

५७. ** जावे गझलेच्या गावा **



भोगतो मी दु:ख माझे छंद माझा
सोहळा दु:खात हा आनंद माझा

पिंपळाचे पान माझे प्राण आहे
हा झुलावा श्वास पण बेधुंद माझा

सूर्य नाही पाहिला मी माणसांनो
कोवळा मी फक्त किरणानंद माझा

प्रख्यात गझलकार मजरुह सुलतानपुरी एके ठिकाणी म्हणतात ' गझलचा शेर आपल्याला अर्थ सांगत नाही तर तो अर्थाची दिशा दाखवतो. रसास्वाद म्हणजे अर्थाची दिशा असू शकते. मात्र गझलियतपुढे विचार, चिंतन, मनन सगळंच तोकडं ठरतं. रसिकांनी अर्थाच्या उंबरठ्यावर न रेंगाळता आत प्रवेश करून तो फील अनुभवणं अपेक्षित असतं.' बरोबर ना ?

गझलचा अवकाश मोठा आहे, त्याची व्याप्ती देखील मोठी आहे. गझलची तंतोतंत व्याख्या सांगता येत नाही ते यामुळेच. कारण गझल हे फक्त वृत्त नसून ती एक वृत्ती आहे. छंदोबध्दता, आकृतिबंध यामध्ये जरी गझल

बंदिस्त झाली असली तरी त्यातील भावभावनांचा उत्कट असा बेभानपणा, दिलदारपणा, बेदरकरपणा, आणि बिनधास्तपणा आपल्याला भावतो आणि आपण त्या गझलेच्या प्रेमात पडतो. बाकी काही म्हणा, मोघलांनी आपल्याला दोन सौंदर्यशाली गोष्टी दिल्यात. त्या म्हणजे एक ताजमहाल आणि दुसरी म्हणजे गझल. गझलेचा परिमळ आपल्याकडे दूरवर पसरला आणि चांगलाच रुजला.

देवघरातील मंद ज्योतीसारखी तेवणारी गझल आणि जीव जडलेल्या त्या दोघांचं एकमेकांत समर्पित होणं, तद्रूप होणं आणि नंतर प्रेमभंगात व्याकुळ होऊन झुरत जाऊन स्वतःलाच जाळणारी म्हणजे गझल.

अशा पार्श्वभूमीवर कोकणातले कवी, समीक्षक डॉ बाळासाहेब लबडे यांच्या लेखणीतून उतरलेला 'एक कैफियत' या शीर्षकाचा त्यांचा पहिला गझल संग्रह माझ्या वाचनात आला. या पूर्वी त्यांचे दोन कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. तेही मी वाचले आहेत. त्यांची एकूण १५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत तर काही पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. कविता, कथा, कादंबरी, समीक्षा, संपादने अशा विविध साहित्यप्रकारात त्यांनी मुशाफिरी केली आहे. काही महत्वाच्या पुरस्कारांनी त्यांना आजवर सन्मानित केलं आहे. या संग्रहाच्या निमित्ताने डॉ लबडे यांनी गझलप्रांतात मोठ्या आत्मविश्वासाने आपलं पहिलं पाऊल टाकलं आहे. आजकाल मराठी गझल मोठ्या प्रमाणात लिहिली जात आहे. ती गायली देखील जात आहे. मात्र विविध संमेलनात कवी कट्ट्याप्रमाणेच स्वतंत्र अशा गझल कट्ट्याचे आयोजन का केले जाते ते समजत

नाही. मला वाटतं शेवटी गझल म्हणजे एक निखळ कविताच असते. गझल हा एक कवितेचाच एक प्रकार आहे. नाही का ?

दुसऱ्याच्या मरणापायी हळहळतो आम्ही
सुख पाहुनी दुसऱ्याचे जळफळतो आम्ही

जागोजागी असते पानीपत जीवन हे
मरण्याची भीती जगण्याला पळतो आम्ही. (पृष्ठ-६४)

जीवनावरचे हे जळजळीत भाष्य कवी ताकदीने शब्दांच्या रूपाने कागदावर उतरवतो. साधंसुधं जगण्यासाठी देखील विविध पातळीवर आज किती यातायात करावी लागते आहे हे आपण सारेच जाणतोच. गझल म्हंटलं की शेरोशायरी आली, स्वप्नांचे महाल आले, प्रेमाच्या आणाभाका, विरह, सौंदर्य दृष्टी सारं सारं आलंच. तशा विषयांच्या गझला याही संग्रहात आहेत. मात्र तुलनेनं कमी. उदा.

ती सोबती प्रेमात माझ्या चालली
माझीच ती माझी निघाली सावली (पृष्ठ- ३७)

प्रेम जर भंगले कोणती दवा आहे ?

ना दवा कोणती फक्त ती हवा आहे. (पृष्ठ-४३)

परंतु सामाजिक जाणिवेचं प्रखर भान असणाऱ्या कवी डॉ बाळासाहेबांनी विविध गझलांमधून आजच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवर देखील भाष्य केलं आहे हे महत्वाचं आहे.

फोडता हा संप ऐटीत चाले
अन माजोरी आज सरकार झाले. (पृष्ठ-२५)

जर माणसा कळते शहर, तर काळजा छळते शहर
हे उत्सवी हे छानसे मग आत जळते शहर. (पृष्ठ-१८)

एकूण ८७ रचनांमधून कवी लबडे यांनी गझलांचे विलक्षण असं विश्व उभारलं आहे. त्यातील काही रचनांना चाली लावून त्याचा छानसा गझलांचा एखादा कार्यक्रम होऊ शकतो. या संग्रहास ज्येष्ठ गझलकार श्री ए के शेख यांची प्रस्तावना लाभली आहे. त्यात ते म्हणतात.' सहजता हा त्यांच्या गझलेचा आत्मा असून आशयाचा तो स्वाभाविक आविष्कार वाटतो. प्रा. लबडे यांची गझल त्यामुळे सोपी वाटते. तिचे पैलू सर्वार्थाने आकळतात. त्यांच्या ठिकाणी असणारी मानवतावादी सहभावना यांचे आविष्करण त्यांच्या गझलेतून होतं.' तर कवी बाळासाहेब आपल्या मनोगतातून गझललेखनाची स्फूर्ती मला

गझलकार ए शेख भीमराव पांचाळे आणि इतर मंडळींकडून मिळाली असे नमूद केले आहे. या संग्रहाची पाठराखण (Blurb) प्राचार्य डॉ अविनाश सांगोलेकर यांनी केली असून त्यात ते म्हणतात ' ही गझल उपरोध, उपहास, मिश्कीलपणा, सडेतोडपणा यांनी युक्त असून नवा ढंग आणि नाविन्यपूर्ण आविष्कार करत तिनं गझलकाराच्या अंतरीची सल विविध वृत्तांमधून मंडळी आहे.'

संग्राहाचे अनुरूप मुखपृष्ठ चित्रकार श्री संतोष धोंगडे यांनी रेखाटले असून पुण्याचे प्रकाशक महाजन पब्लिशिंग हाऊस यांची निर्मिती उत्तम आहे. आपला पहिलाच गझलसंग्रह कवी लबडे यांनी आपल्या सहचारणीला अर्पण केला आहे.

राती सुन्या मनाच्या सरल्या हळूहळू
मज ओंजळी फुलांनी भरल्या हळूहळू (पृष्ठ-८२)

असं सहजसुंदर, भावमधुर लिहिणाऱ्या या कवीकडून वाचक रसिकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्यांच्या कवितेला अजून वेगवेगळे आयाम मिळोत अशा सदिच्छा व्यक्त करून थांबतो.

(एक कैफियत- गझलसंग्रह, कवी: डॉ बाळासाहेब लबडे, प्रकाशक : महाजन पब्लिशिंग हाऊस, पुणे.)

a

५८. ** प्रखर जाणिवांचा सातबारा **



संस्कृतीच्या नावाने त्यांनी

लपेटून घेतली होती

नाव, जात आणि धर्माची वल्कलं

ठाऊक नव्हतं त्यांना की

माखली होती ती माणसांच्याच रक्तानं

द्वेषाच्या निबिड काळोखात

त्यांचा बिघडलेला तोल जरी सुटून गेला होता
तरी रागाच्या भरात त्यांनी मारलेले दगड
पेटलेले होते सुडाने
आणि फुटले होते विनाकारण
कुणाच्यातरी निरपराध डोक्यावर !

सध्याचा काळ आणि भवताल अस्वस्थ आहे. जगाच्या आणि देशाच्या कानाकोपऱ्यात जरा काही विपरीत घडलं तर त्या घटनांचे तीव्र पडसाद अगदी थोरामोठ्यांच्या मनावर क्षणभरात उमटतात आणि यथावकाश चहूदिशांना विद्युतवेगाने पसरतात. तीस-चाळीस वर्षांपूर्वीच्या काळात अशा घटना घडतच नव्हत्या असे नव्हे मात्र त्यावर व्यक्त होण्यासाठी आजच्यासारखी फोफावलेली प्रसार माध्यमं नव्हती. आता तसे नाही. फेसबुक, ट्विटर, वॉट्सअप या माध्यमातून विविध घटनांवर, प्रसंगांवर अगदी कोणीही सहजपणे व्यक्त होऊ शकतो. तो त्याची भूमिका मांडू शकतो. इंटरनेटच्या महाभयानक वेगामुळे जग नको तेवढं जवळ आलंय. त्याचा चांगला, वाईट परिणाम रोजच आपण अनुभवत असतोच.

आजच्या अस्वस्थ भवतालचे पडसाद जेव्हा एखाद्या संवेदनशील मनावर उमटतात आणि तो जर कवी असेल तर ? दुर्दैवाने आज कोणतेच असे क्षेत्र राहिलेले नाही की त्या क्षेत्रात सारं आलबेल आहे, शांती आहे. आजची रोज वेगाने बदलणारी राजकीय-सामाजिक-आर्थिक परिस्थिती, समीकरणे, संदर्भ.

विविध गटातटाच्या राजकारणात, जातीधर्माच्या जोखडात अडकलेला आजचा समाज जणू दिशाहीन झालाय की काय अशी अवस्था. ज्यांच्याकडे दिशादर्शक म्हणून आशेनं पहावं अशी विविध क्षेत्रातील धुरीण माणसं कुठे गेली ? आणि जी आहेत ती नेमकं काय करीत आहेत अशी स्थिती आहे. देशावर सत्ता कुणाचीही असो त्यांच्या गलिच्छ राजकारणात भरडतो तो सामान्य माणूस. या सामान्य माणसाची कैफियत ऐकून घेण्याची तसदी देखील ही मंडळी घेत नाहीत. न्याय, दाद वगैरे मिळणे ही खूप पुढची गोष्ट. अशा वेळी अशा सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करणारा हा कवी आपल्या नेमक्या शब्दातून, कवितेतून कागदावर उमटवतो आजच्या वास्तवाचे भेदक चित्र. या कवितासंग्रहाच्या शीर्षकामध्येच त्या कवितांचे वेगळेपण एकवटले आहे. 'मी देशाचा सातबारा लिहीन म्हणतो'. कवी, समीक्षक श्री रमेश सावंत यांचा हा पाचवा कविता संग्रह आणि सातवे पुस्तक.

देशोधडीला लागलेली माणसं मात्र

विटक्या बोचक्यात अन फाटक्या गाठोड्यात

केविलवाणा संसार पाठीवर घेऊन

पांगतात विस्कटलेल्या गावकुसातून

उजाड झालेली गावं सोडून

अशा कवितांमधून इथल्या भ्रष्ट, स्वार्थी व्यवस्थेशी टक्कर देणारा सामान्य माणसाचं चित्रण कवी रमेश सावंत रेखाटतात तेव्हा आपण निःशब्द होतो. एकूण बावन्न दाहक अनुभूतीच्या कविता एकापाठोपाठ वाचक वाचत असताना या कवीने आपल्याला एका मोठ्या आरशासमोर उभे केले आहे याची

प्रचिती येते. आपलेच प्रतिबिंब आपल्याला काही गोष्टी मूकपणे सांगत आहे असेही जाणवते. देशाचा सातबारा लिहिणे ही खरी तर अवघड गोष्ट आहे. मात्र कवी रमेश सावंत यांना ही कला साधली आहे. श्री सावंत यांनी आपल्या समर्थ शब्दशैलीतून, अभ्यासातून चक्क देशाचा सातबारा लिहायला घेतला आहे. त्या सातबाराच्या रकान्यात या कवीने धर्म, संस्कृती, परंपरा, सुखदुःख, विविध जाणिवा, विद्रोह, चळवळी, संघर्ष, माणुसकी, विकास, राजकारण-समाजकारण अशा विविध विषयांचा उहापोह आजच्या दाहक वास्तवाचे भान ठेवून कवितांच्या माध्यमातून प्रभावीपणे लिहिला आहे. मला तर वाटते की हा एक वेगळा प्रयोग आहे या सातबाऱ्यात कवीने निखळ माणूसपणाच्या जाणिवांना, संवेदनांना स्पर्श केला आहे म्हणून मला तो महत्वाचा वाटतो. कवी सावंत आपल्या मनोगतात म्हणतात ते खरे आहे. " या कवितांमधून एकीकडे सामान्य माणसाच्या व्यथेचा दाहक आवेग प्रकट होताना दिसेल तर दुसरीकडे माझ्या कविमनातून उसळून येणारी प्रखर सामाजिक जाणीव !" आजूबाजूचा अस्वस्थ कल्लोळ, निरीक्षणे कवी सावंत यांनी अतिशय संयत अशा शब्दात रेखाटली आहेत.

संग्रहातील काही कविता थोडा वेगळा आशय घेऊन आपल्यासमोर उभ्या ठाकतात. उदा. माझ्या कवितेच्या राखेतून, जिद्द, शर्यत, भाकरी, गाणं आभाळमायेचं, सुगीचे दिवस, पुन्हा उगवून येण्यासाठी, आभाळभर दुःखाचं गाणं, इवलेसे गीत गाण्यासाठी, इथल्या प्रेमळ भूमीत, अशा आशादायक कवितांमधून कवी सकारात्मकतेच्या पथावर चालल्याचे आपल्याला दिसून

a
येते. हा देश पुन्हा सुजलाम सुफलाम नक्कीच होईल असा विश्वास कवीकडे नक्कीच आहे. एकेठिकाणी कवी सावंत म्हणतात.

म्हणूनच म्हणतो की
करूया मशागत बंधुत्वाची
तरारून येईल पीक माणुसकीचं
मुळातच मायाळू असलेल्या
इथल्या प्रेमळ भूमीत

सगळे वाद, जखमा विसरून पुन्हा आपण सारे एकत्र आलो तर आपल्या प्राणप्रिय देशाच्या मातीमध्ये पुन्हा नक्कीच 'तरारून येईल माणुसकीचं पीक' असा प्रखर आशावाद वाचकास देणारे कवी, समीक्षक रमेश सावंत यांच्या आगामी लेखन प्रवासास खूप शुभेच्छा. संग्रहातील आशयाला, विषयाला सुसंगत असे मुखपृष्ठ चित्रकार अरविंद शेलार यांनी सुरेख काढले आहे. अष्टगंध प्रकाशनची ही निर्मिती दर्जेदार आहे. या दोघांचेही अभिनंदन.

(मी देशाचा सातबारा लिहीन म्हणतो (कवितासंग्रह), कवी रमेश सावंत, अष्टगंध प्रकाशन, मीरा रोड, ठाणे.)

५९. ** प्रत्ययकारी कवितांचा कॅनव्हास **

मला माहित आहे सध्याच्या स्थितीत
मी काही बोललो तर
तुम्ही माझी मुस्कटदाबी करणार



मला माहित आहे सध्याच्या स्थितीत
मी काहीही लिहिलं तरी
त्याची तुम्ही चिरफाड करणार

मी उजवीकडे वळलो तर
मला उजवा समजणार
मी डावीकडे वळलो तर
मला डावा ठरवणार

ही लोकशाही आहे की ठोकशाही ?
खऱ्या अर्थाने जाहीर करा खुलेआम
सध्या दिवस तुमचे आहेत.

a

आपण सारेच जाणून आहोत, गेल्या आठ-दहा वर्षांपासून आपल्या आजूबाजूचा भवताल अस्वस्थ आणि नको इतका संवेदनशील बनत चालला आहे. त्यापूर्वीची परिस्थिती ठीकठाक होती, लोकशाही गुण्यागोविंदाने नांदत होती तसे अजिबात म्हणायचे नाही. मग ? राजकारण्यांच्या साठमारीत निखळ माणूसपण कुठेतरी हरवत चालल्याची प्रखर भावना जाणवत आहे हे नक्की. विविध प्रकारचे संदर्भ देखील झपाट्याने बदलत आहेत. यास कोण जबाबदार त ? हे सारं कशामुळे आणि कोणामुळे ? हा विषय तूर्तास नाहीच. फोफावलेलं इंटरनेटचे साम्राज्य, त्या समाजमाध्यम क्षेत्रात कधी कधी कोरड्या चेहऱ्याने आणि मनानं वावरणारी माणसं. धर्म, जातपात, निष्ठा, राजकारण यावर भरभरून व्यक्त होणारी माणसं, विविध कळपात, कुंपणात रमणारी माणसं, लहानसहान कारणावरून हमरीतुमरीवर येणारी माणसं, द्वेषापोटी, स्वार्थापोटी, सत्तेच्या लालसेपोटी एकमेकांचा जीव घेणारी माणसं. 'मानसा मानसा, कधी व्हशीन मानूस ?' बहिणाबाईंच्या या आर्त ओळींचा अर्थ आपण जाणून आणि समजून कधी घेणार आहोत ? एक कवी म्हणून या साऱ्याकडे सजगपणे बघताना, भोवतालचे निरीक्षण करताना कवीची किती घालमेल होत असेल ?

कविता कागदावर उतरण्यापूर्वी
असते खवळलेल्या समुद्रात
ज्वालामुखीच्या स्फोटात
एखाद्या जंगलाच्या वणव्यात
ती बाहेर येते शांतपणे

उतरते कागदावर शांतपणे
चिरत जाते वाचकाचे अंतरंग शांतपणे

काळजातली खळबळ, सोसलेल्या वेदना आणि भयकंपित अंतराळ कागदावर कवितेच्या रूपात समर्थपणे, शांतपणे उतरवणारे कवी म्हणजे विलास गावडे. मागील वर्षी म्हणजेच डिसेंबर २०२१ मध्ये त्यांचा पाचवा कविता संग्रह 'सृजनशील आत्म्याचा घोडा' मैत्री पब्लिकेशन्स यांनी प्रकाशित केला आहे. एकूण ८४ कवितांद्वारे वाचकाशी संवाद साधताना कवी सहजपणे बोलून जातो.

मी मांडलंय माझं पोर्ट्रेट
शहरातल्या आलिशान प्रदर्शनात
तुम्हाला कोणता अर्थ काढायचा
तो तुम्ही काढू शकता
माझा कुठलाही आक्षेप असणार नाही.

कवी विलासजी अगदी प्रांजळपणे आपल्या आयुष्याचा समृद्ध पट कवितांद्वारे, अनुभूतींद्वारे वाचकांसमोर ठेवला आहे. ज्याने त्याने ज्याला रुचेल असा अर्थ काढावा, इतकं सोपं. कवी विलास गावडे हे एक अजब रसायन आहे. सारं बालपण, शालेय जीवन मुंबईतल्या लालबाग-परळ सारख्या कामगार वस्तीत गेलेलं. त्यामुळे वृत्तीत बेफिकिरी, बिनधास्तपणा आणि पुढे लेखनात देखील रोखठोकपणा अगदी सहज आलेला. पुढे महर्षी दयानंद महाविद्यालयात

शिकत असताना अनेक थोर साहित्यिकांचा परिचय, सहवास त्यांना लाभला. आज जे जे प्रस्थापित कवी-लेखक मंडळी जोरकसपणे लिहीत आहेत ते सारे जिवाभावाचे मित्र म्हणून विलासजींना त्या काळात लाभलेले. या सर्वांमुळे विलासजींचे आयुष्य समृद्ध होत गेले. १९७० पासून खऱ्या अर्थाने लेखनाला प्रारंभ. कामगार व्यवस्थापन संबंध आणि संघर्ष या विषयाला अनुसरून त्यांच्या अनेक कथा गाजल्या.कथा, कविता, ललित, नाटकांचा अनुवाद यामध्ये मुशाफिरी. आत्तापर्यन्त दहाच्या वर पुस्तके प्रकाशित. अनेकांना महत्वाचे पुरस्कार लाभलेले.

त्यांच्या कॅनव्हास या कविता संग्रहापासून झालेला कवितेचा प्रवास आज दमदारपणे पुढे जाताना आपल्याला दिसतो आहे. याही संग्रहात कॅनव्हास, रंग,चित्र या प्रतिमांचा वापर किंवा संदर्भ घेऊन साकारलेल्या एकूण दहा कविता आहेत. कधीकाळी हायस्कुलमध्ये कविराजांनी चित्रकलेचा अभ्यास केला होता असेही समजते. आजूबाजूच्या गडद भयकारी रंगांचा केलेला वापर आपल्याला कवितेत देखील बघायला मिळतो.

बदललेल्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक घटनांचे खोल पडसाद संग्रहातील बहुतांश कवितांवर पडल्याचे जाणवते. उदा. कवीची अंतिम इच्छा, या रे या सारे या !, मी पोर्ट्रेट रंगवतोय, कुठला रंग राहील सोबत ?, कसा साजरा करावा मी..., काही माणसं, मठ, तेव्हा तुम्हीच ठरवा, फकीराचं देणं, मीही बाहेर जातो, एक करड्या रंगाचा ठिपका, तसं पाहिलं तर, कावळे आता कधी. ई.

a

संग्रहाचे शीर्षकही आगळंवेगळं आहे. कवी विलासजींनी संग्रहाची अर्पण पत्रिका खुद्द आपल्या पत्नी सौ. नीलमताई विलास गावडे यांना अर्पण केली आहे हाही एक वेगळा प्रयोग. त्यात ते म्हणतात 'चौखूर उधळलेल्या घोड्याला लगाम घालण्यासाठी अथक प्रयत्न करून त्याचा सृजनशीलतेचा घोडा बनविण्याचा अट्टाहास करणारी माझी सहचारिणी हिला माझा संग्रह अर्पण !'

संग्रहाच्या मुखपृष्ठावर खुद्द कविराजांची प्रतिमा रेखाटली आहे तर पुण्याच्या मैत्री पब्लिकेशने संग्रहाची निर्मिती, मांडणी सुरेख केली आहे.

आपण रंगवत असतो पोर्ट्रेट कॅनव्हासवर

नियतीला हवं तसं

तसं पाहिलं तर आपल्या हातात काय असतं ?

अल्पाक्षरी शब्दांतून, सहजसुंदर शैलीतून व्यक्त होणारे कवी विलास गावडे यांना पुढील लेखनप्रवासास खूप शुभेच्छा.

(सृजनशील आत्म्याचा घोडा (कवितासंग्रह), कवी विलास गावडे, मैत्री पब्लिकेशन, पुणे.)

a

६०. ** सहजसुंदर आत्मचिंतन : 'मातीत मिसळण्याची गोष्ट' **



'आज हा पर्वत सांगत होता मला, फेकून दे मनातले क्लेश. वर बघ ते स्वच्छ आभाळ. शिखरावरची ती तेज:पुंज पवित्र मूर्ती. आपल्या सुखदु:खाच्या पलीकडे पसरले आहे एक शुद्ध असीम आभाळ. एक शक्ती. नतमस्तक हो. विसरून जा काळजीचे कुरतडलेले कोपरे, मोहाचे धुके, ईर्ष्येची धग. झाडाच्या बुंध्याला वेली लगटाव्यात तसे पाय फसलेत हवेपणाच्या भावनेत. मन प्रचंड

गुंतलेय तुझे रागालोभाच्या पसाऱ्यात. सोडवून टाक पाय या जंजाळातून. हा नश्वर देह.'

एखाद्या मुक्तछंद कवितेसारखे अलगद मनात झिरपत जाणारे त्या लेखिकेचे हे मुक्तचिंतन. कवयित्रीच्या नजरेनं टिपलेली असंख्य निरीक्षणे, नोंदी, आठवणी संग्रहाच्या पानोपानी वाचकाला दिसू लागतात. वाचक हळूहळू त्यात गुंतत जातो आणि एका समृद्ध अनुभूतीच्या शिखरावर अगदी अलगद जाऊन पोहोचतो. एकूण चोवीस ललित लेखांच्या कॅनव्हासवर लेखिकेनं केली आहे मुक्त उधळण विविध भावरंगांची, लयबद्ध रेषांची ! त्यात कधी असतात नात्यांचे तरल रंग, निसर्गाचे विभ्रम अविष्कार, भटकंतीतले प्रसन्न क्षण, अटळ अशा भोग वेदना आणि काही रंग व्याकुळ करणाऱ्या आठवणींचे ! . 'मातीत मिसळण्याची गोष्ट'. कवयित्री, अनुवादक प्रा. सुजाता राऊत यांचा अलीकडेच प्रकाशित झालेला महत्वाचा ललित लेख संग्रह. सुजाता राऊत यांचे हे चौथे पुस्तक. 'उगमाकडे जाताना' आणि 'स्वतःपासूनच दुरावताना' (अनुवादित) हे दोन कविता संग्रह आणि 'प्रयत्न धरू यशपंथ' हा अनुवादित लेखसंग्रह त्यांच्या नावावर आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस कवितेवरची बंधनं काहीशी शिथिल होऊ लागली. म्हणजे वृत्त, छंद, लय यामधून मुक्तछंद, निर्यमक कविता असेही प्रकार दिसू लागले. तपशीलवार, चिंतनात्मक आणि काहीसा वैचारिक गद्यसदृश स्वरूपाचा काही भाग कवितेत सामावला जाऊ लागला. पुढे तर कवितेत आढळणारा कल्पनाविलास, उत्कटता, आर्तता या सर्वांना गद्य साहित्यात स्थान मिळू लागले. वाचकांनी अर्थात अशा प्रयोगाचे स्वागतच

केले. गद्यपद्य आकृतिबंधाच्या सीमारेषा हळूहळू पुसट होऊ लागल्या. अगदी सोप्या भाषेत सांगायचं म्हणजे अल्पाक्षरी कवितेचा मोठा आशय गद्य लेखात अगदी चपखलपणे बसला. ललित बंधाचा उगम हा असा झाला असावा. लेखकाचं अनुभवविश्व, आठवणी, छोटे मोठे प्रसंग, घटना, निसर्ग, व्यक्ती, आजूबाजूचा कोलाहल, निरीक्षणे, जीवनभाष्य, नातीगोती, सारं सारं कवितेच्या अंगानं ललितबंधात झिरपू लागलं. आणि ललित लेखन करणारा लेखक हा जर कवी असेल तर त्या ललित लेखनशैली वाचकाला नक्कीच समृद्ध करून जाते. काही उदा. इंदिरा संत, शांताबाई शेळके, अरुणा ढेरे, वासंती मुझुमदार, नीरजा ई. याच मांदियाळीतलं एक सशक्त नाव. कवयित्री, अनुवादक प्रा. सुजाता राऊत. राऊत यांची लेखनशैली सहजसुंदर, प्रवाही, आणि चिंतनात्मक अशी आहे. तिला अलंकृत भाषेचा सोस नाही. एकीकडे आजूबाजूचा भवताल एखाद्या टिपकागदासारखा टिपताना दुसरीकडे आयुष्यचं मर्म, त्यातला गुंता त्या वाचकांसमोर सहजपणे मांडतात. या संग्रहातील चोवीस लेखांचा आढावा घेणं केवळ अशक्य. संग्रहातील काही पृष्ठांवर गवाक्षामधून पडलेल्या आणि मला गवसलेल्या काही सोनतुकड्यांचा परिचय वाचकांना करून देणे मात्र आवश्यक.

खिडक्यांची चौकट. आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग. प्रवासाच्या निमित्ताने म्हणा किंवा अन्य कारणाने या चौकटीतलं सौंदर्य आपण अनुभवतो. मात्र लेखिकेला त्या चौकटीतून दिसले माणसांचे आजवर न दिसलेले चेहरे. पुण्यातील शिवकालीन जीर्ण खिडक्या, हिमालयातील काही खेड्यांमधल्या खिडक्या, युरोप टूर, राजस्थानच्या प्रवासात दिसलेल्या लोभस, कलासक्त

खिडक्या. पण खिडक्यामागचं गहिरं दुःख लेखिकेला जाणवतं. त्या म्हणतात ' कित्येक प्रसन्न खिडक्या उघडत गेल्याच आयुष्यात. तर काही खिडक्या न उघडलेल्याच बऱ्या. शेवटी आपल्या मनाची खिडकी उघडून स्वतःच्या अंतःकरणात बघता आलं पाहिजे'. किती सुंदर ! पहिल्याच लेखातून लेखिकेची सूक्ष्म निरीक्षण शक्ती वाचकाला थक्क करते आणि पुढचे सारे लेख एकापाठोपाठ वाचण्यास त्याला उद्युक्त देखील करते. साक्षात गंगेच्या उगमाकडे निघाल्यावर लेखिकेच्या मनात साठत गेलेला निःसंग भाव दाटतो. गंगेचं अजस्र रूप आणि शेवटी तिला सागरात लुप्त होतानाची गंगेची झालेली तगमग 'गंगाजी का तट हो' या लेखात लेखिकेनं प्रभावीपणे शब्दबद्ध केली आहे. ज्ञानेश्वर माउलीने शरीराला क्षेत्र म्हंटलं आहे. हे क्षेत्र कालांतराने जीर्ण होत जाते. ती एक सहजसुंदर निसर्गप्रक्रिया आहे. मृत्यू अटळ आहे. मोहमायाचे पाश सोडून निसर्गामध्ये म्हणजेच अखेर मातीत मिसळणे हेच अंतिम सत्य उरतं. ' मातीत मिसळण्याची गोष्ट' या लेखातून अंतिम प्रवासाचे आयाम रेखाटले आहेत. दुसऱ्या जमिनीत तिच्या मनाचे बी रुजलेच नाही अशा 'भूमी'चे अस्वस्थ चित्र रेखाटताना लेखिका म्हणते.' आयुष्यात सगळ्याच पातळ्यांवर हरलेल्या माणसांसारखी भूमी कोषात गेली' . तसा वाचकही अस्वस्थ होतो. 'मिटलेले झाड' लेखात सुमूच्या आईला प्रश्न विचारला जातो ' इतक्या उन्हात कशाला घालता हो वाळवण ?' यावर सुमूची आई जे उत्तर देते ते ऐकून वाचक हादरतो. ती म्हणते ' आमच्या जन्माचं सगळं वाळवण झालंय. उन्हाचं काय ?' ‘ प्रेमाचं शुभ्र संगीत', 'दुःख कालिंदीचा डोह', 'स्वामी..प्रगल्भ वाटेवरची प्रवासिनी' लेखांमधून आपल्याला सशक्त चित्रपटाचा कॅनव्हास अनुभवायला मिळतो.

'सुखे सावन बरस गए' या लेखात लेखिका म्हणते ' आपले वय वाढत जाते तसा मनातला श्रावण सुकत जातो.अंतर्यामीची ओल हरवत जाते ' किती अर्थपूर्ण ! युरोप टूर दरम्यान रसिक नजरेनं टिपलेली निरीक्षणे 'एक शहर में हर कोई' मध्ये जागोजागी दिसतात. उदा. लंडन..अदबशीर, खानदानी, पॅरिस... रंगेल, उडत्या चालीचे, रोम... रोमारोमात इतिहासाच्या रम्य खुणा घेऊन स्वतःतच रमलेले. सुरेखच ! 'खिचडी' लेखात प्रधान काकांचे अस्वस्थ करणारं भावचित्र रेखाटलं आहे. पहिल्या पावसाचा थरार, सौंदर्य आणि सोबतीला कुसुमाग्रजांची कविता याचा सुरेख नादमय मेळ आपल्याला 'पापण्यांवरचा कृष्णमेघ' लेखात दिसतो. 'पुन्हा उगवते रान' एक अस्वस्थ करणारा तो प्रसंग. वयाच्या अकराव्या वर्षी लहानग्या अक्षयचं (भाच्याचं } अकाली निघून जाणं, पुढे त्याच्या आठवणीत गुंतून जाणं, व्याकुळ होणं हे तर लेखिकेनं प्रत्यक्ष अनुभवलेलं. 'जिंदगी इतकीही छोटी नसावी की मागे राहिलेले सारे सुन्न होऊन जावेत दगडी मूर्तीसारखे !' ही ओळ आपल्याला निःशब्द करते. 'मृगजळ दिसे साचपण ऐसे' अखेरचा लेख. आपापल्या स्वप्नांचा पाठलाग करताना थकून गेलेल्या निरागस मुली, वास्तवाची धग बसल्यावर झालेला भ्रमनिरास, आलेली हताशा लेखात प्रतिबिंबित झाली आहे. खरं तर हे आजच्या मुलींचं प्रातिनिधिक चित्र आहे.

ज्येष्ठ संपादक, कवी अरुण शेवते यांनी या संग्रहाची पाठराखण केली आहे. ते म्हणतात ' आसपासच्या पर्यावरणाकडे, व्यक्तींकडे लेखिका सजगपणे पाहताना दिसते. हे जग समजून घेण्याची असोशी त्यातून येते. लेखिकेची लेखन शैली अनलंकृत व प्रवाही आहे.' तर लेखिका सुजाता राऊत आपल्या मनोगतातून आपल्याशी संवाद साधतात. ' माझ्या आयुष्याच्या मर्यादित

a

परिघात मी जे काही अनुभवले तेच थोड्याफार प्रमाणात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आजूबाजूचा भवताल, स्पंदने टिपण्याचा हा प्रयत्न आहे.'

ठाण्याच्या सृजनसंवाद प्रकाशन यांची ही निर्मिती, मांडणी दर्जेदार आहे. चित्रकार अश्विनी खटावकर यांनी साकारलेले मुखपृष्ठ आतल्या ऐवजाला साजेसं, सुंदर, नेटकं आहे. कवयित्रीच्या नजरेनं टिपलेल्या अस्वस्थ नोंदींचा आविष्कार वाचकाला नक्कीच भावेल यात शंकाच नाही.

(मातीत मिसळण्याची गोष्ट (ललितलेख संग्रह): लेखिका : सुजाता राऊत, प्रकाशक : सृजनसंवाद प्रकाशन, ठाणे.)



६१. ** निखळ माणूसपण जपणाऱ्या चौकटीबाहेरच्या कथा **

' जगात सगळीच माणसं वाईट नसतात. काही चांगली पण असतात. ती आहेत म्हणून चांगुलपणा टिकून आहे. फक्त ही माणसं आपल्या आयुष्यात आली पाहिजेत. तशी ती आली, की आपल्या जगण्याला कारण मिळतं. आशा निर्माण होते आणि आयुष्याला काहीतरी आकार मिळतो. आयुष्याचं सोनंही होऊ शकतं. अशीच एक व्यक्ती मला भेटायला आली तीही त्या गोठ्यात ! '

जिवलगांनी, समाजानं गोठ्यात डांबून ठेवलेली (खरं तर उकिरड्यावर टाकलेली) 'प्रतिभा' प्रतिकूल परिस्थितीवर मात करते, पुन्हा उभी राहते. असह्य वेदनांचा, नजरांचा दाह पचवून ती पोटातला गर्भ वाढवते, आणि त्यानंतर स्वकर्तुत्वाच्या बळावर विलक्षण गरुडझेप घेते, रणमर्दिनी होते. ज्या समाजानं तिला नाकारलेलं असतं तोच समाज तिचा जाहीर सत्कार करतो, पुरस्कार देतो. आणि त्याचवेळी जो नराधम या परिस्थितीला कारणीभूत असतो त्या नालायक

सर्जेरावाच्या सर्वांच्या समोर ती मुस्काटात लगावून देते. ‘रणमर्दिनी’ या तिसऱ्या कथेतला हा अंश. अशा विविध व्यक्तिरेखांच्या माध्यमातून स्त्रियांचं जगणं, त्यांचं नशीब, त्यांचे भोग, कुटुंबव्यवस्था, अस्वस्थ भवताल, संधीसाधू, भोंदू समाज याचं प्रत्ययकारी चित्रण तरुण लेखिका, कवयित्री प्रियांका पाटील यांनी 'इब्रु ' या कथासंग्रहात रेखाटलं आहे. लेखिकेनं उभ्या केलेल्या या दहा कथांच्या साम्राज्यात वाचक विविध प्रश्नांच्या, अनुभूतीच्या जंजाळयात गरगरत राहतो.

इब्रु'. आगळ्यावेगळ्या शीर्षकापासूनच वाचकांची उत्सुकता वाढवणारा एक महत्वाचा कथासंग्रह. 'इब्रु'. ख्यातनाम चित्रकार अन्वर हुसेन यांच्या समर्थ कुंचल्यातून साकारलेलं आणि आतील ऐवजाचं, वेदनेचं प्रतिनिधित्व करणारं बोलकं मुखपृष्ठ. 'इब्रु'. मनुष्य प्राण्यांमध्ये लपलेली मनोवादळे, त्यांचं जगणं, भोगणं, सगळंच, शब्दरूपानं कागदावर उमटवून नवविचारांचा ऑक्सिजन वाचक रसिकांना देणारा कथासंग्रह. 'इब्रु'.

'इब्रु' या आगळ्यावेगळ्या शीर्षकाचा अर्थ याच संग्रहात आपल्याला सापडतो. कन्नड भाषेतला हा शब्द. बोली भाषेत 'इब्रु ' या शब्दाचा अर्थ आहे दोघी आणि 'इब्रू' शब्दाचा अर्थ दोघीही.! दहा कथांमध्ये हरवताना वाचकाला 'त्या ' दोघींचा' अर्थ सावकाश उमजत जातो.

या कथा पारंपरिक किंवा चाकोरीबद्ध नाहीत. जे मनात आहे, ते ओठात आहे आणि तेच कागदावर उमटले गेले आहे अशी रोखठोक भूमिका लेखिकेची आहे. तिच्यामधल्या तिचं आणि त्याच्यामधलं तिचं विलक्षण नातं कथांमधून आपल्यापर्यंत झिरपत जातं. आजूबाजूच्या शुष्क, दिखाऊ आणि भंपक समाजाच्या मानसिकतेच्या चौकटी भेदून स्वच्छ, नितळ आभाळाला गवसणी

घालण्याची उर्मी या कथांमधल्या अनेक व्यक्तिरेखांमध्ये आहे. यातील कथांना स्त्रीवादाचे कंगोरे नाहीत मात्र कथांना निखळ माणूसपण जपणारा दुर्मिळ गंध आहे. म्हणूनच आजच्या काळात हे लेखन मला महत्वाचं वाटतं.

पहिल्याच 'इब्रु' कथेत चन्नव्वा, कावेरी व्यक्तिरेखा उभी करताना लेखिकेनं समलैंगिकता या विषयाचा आणि त्यासंदर्भातल्या जाणिवांचा एक वेगळाच पैलू, कंगोरे, जगणं, समस्या आपल्यापुढे मांडली आहे. ही कथा आपल्याला सुन्न करतेच. तर पुढच्या 'त्याच्यातली ती' या कथेतून लेखिका तृतीयपंथीयांच्या एकूण जगण्यावर, तसेच त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन कसा असतो यावरही प्रखर भाष्य करते. सर्वगुणसंपन्न, कर्तृत्ववान आणि बलवान असा 'तो', समाजात आपल्याला ठिकठिकाणी दिसतोच. शेवटी त्याच्यामागे केवळ 'ती' असते म्हणूनच 'तो' घडतो हे 'डेस्टिनेशन' या कथेतून अधोरेखित होते. 'मोक्ष' कथेतून वंशाला दिवा म्हणजे मुलगाच हवा ह्या अतिरेकी ध्यासातून, वेडातून स्त्रीची होणारी ससेहोलपट प्रभावीपणे रेखाटली आहे. 'बोगदा' कथेतून 'सेक्स वर्कर' हा वेगळाच विषय रेखाटला आहे. 'रांजण' कथेमधून दुर्देवी विधवा स्त्रीचे दुभंगलेपण रेखाटले आहे. 'सिक्रेट बॉक्स' मधून वेड्या प्रेमात फरफटत जाताना होणारी जीवघेणी फसवणूक चितारली आहे. ' ना-स्तन' कथेतून स्तनाच्या कॅन्सरमुळे एकीला आपले स्तन गमवावे लागतात. ती उध्वस्त होते. मात्र नवरा खंबीर असतो. तो शेवटी म्हणतो ' स्तन बाईला पूर्णत्व देत नाहीत, तर बाई त्या स्तनांना पूर्णत्व देते' असा मोलाचा सल्ला देतो.

आपल्या मनोगतातून प्रारंभीच लेखिका प्रियांका पाटील हिने सांगितले आहेच की आपल्या कॉलेज जीवनात प्रख्यात लेखिका गौरी देशपांडे, अमृता

प्रीतम, अरुंधती रॉय यांच्या लेखनाने आपण प्रभावित झालो होतो. त्यांच्या लेखनाचा प्रभाव प्रियांका पाटील यांच्या लेखन शैलीवर आपल्याला स्पष्टपणे दिसतोच. आपल्याशी संवाद साधताना ती म्हणते ' समाजाच्या साचेबद्ध चौकटीतून बाहेर फेकलेल्या या बायका. कुणी घटस्फोटिता, कुणी बिन बापाची, कुणी वेश्या, तृतीयपंथी, बलात्कारित, निखळ बाईपण हरवून बसणारी. अशा कितीतरी बायांनी, जिवंत हाडामांसाच्या पात्रांनी माझं संपूर्ण आयुष्य व्यापलं आणि मग माझ्या व्यथा कथारूपात कागदावर अवतरू लागल्या' .

पद्मश्री मधुभाई कर्णिक आपल्या अभिप्रायातून म्हणतात ' प्रियांका पाटील हिच्या कथांमधून भेटणाऱ्या स्त्रिया व पुरुषही एकविसाव्या शतकातल्या जागतिक मानवी संबंधांच्या परिवर्तनशील पर्यावरणाच्या द्योतक आहेत.'

आपल्या पहिल्याच कथासंग्रहाद्वारे तरुण लेखिका, कवयित्री प्रियांका पाटील हिने साहित्य क्षेत्रात दमदार पाऊल टाकलं आहे. पहिला संग्रह असूनही कुठेही नवेपणाच्या खुणा नाहीत. दहा दमदार कथांमधून उद्याची सशक्त कथालेखिका डोकावते हे नक्की. मात्र लेखनाचं सातत्य तिनं पुढेही ठेवावं. पुण्याच्या मेनका प्रकाशन यांनी या कथासंग्रहाची दर्जेदार निर्मिती केली आहे. मुखपृष्ठ, मांडणी, प्रिंटिंग सारंच अप्रतिम. प्रियांकाच्या पुढच्या लेखनप्रवासास खूप शुभेच्छा.

(इब्रु- कथासंग्रह : लेखिका : प्रियांका पाटील, प्रकाशक : मेनका प्रकाशन, पुणे.)

६२. ** स्त्री जाणिवेचा अस्वस्थ पदर **



बायका
खूप सावरून धरतात जगणं
त्यातुनही अडकलंच एखादं टोक
सांदीकोपऱ्यात अडगळीत
तर स्वतःला पुन्हा पुन्हा
हिसके देत राहतात बायका.
तरीही नाही सुटलं ते
तर पालीसारखं तोंडूनच टाकतात त्या ते.
पण पालीसारखं झटपट मोकळं
नाही होता येत त्यांना !

आजची स्त्री फक्त चूल आणि मूल यामध्ये रमलेली नक्कीच नाहीये. शिक्षणाची कास धरत ती प्रगतीच्या, यशाच्या शिखरांना स्पर्श करीत आहे. विविध क्षेत्रांमध्ये ती नाव कमवत आहे. हे सारं साधत असताना तिचं दुर्लक्ष आपल्या घरकुलाकडे, आपल्या माणसांकडे अजिबात झालेलं नाहीये. उलट सर्वांना आपलेसं करून ती पुढे जात आहे. इतकं सारं संचित असूनही अर्थार्जनासाठी उंबरठ्याबाहेर पडल्यावर अनेक विखारी नजरांना आणि लोचट

स्पर्शांना तिला सामोरं जावं लागतं. कारण नसताना दुसऱ्यांचे टोमणे, विचित्र कॉमेंट्स तिला ऐकायला लागतात. पण आपलं घर विस्कटू नये, नात्यांमधली वीण उसवू नये यासाठी ती जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करते. या दाहक अनुभवापेक्षा कधी कधी मनातली घुसमट अधिक वेदनादायी असते. पुन्हा काळ कोणताही असो ही घुसमट तिला काही टळलेली नाही. यामध्ये कधीकधी आपली माणसंही असतात त्यावेळी त्या स्त्रीचा कोंडमारा अधिक तीव्र स्वरूपाचा असतो. अनेकांची इच्छा असूनही त्यांना व्यक्त होता येत नाही. त्याची वेगळी कारणं असू शकतील. पण ती स्त्री जर लेखिका, कवयित्री असेल तर भवतालची आणि अंतर्मनाची घुसमट ती प्रभावी, मोजक्या शब्दात कागदावर मांडू शकते. हे सारं मांडल्यावर ती काहीशी मोकळी होते. कवितेच्या माध्यमातून ती आपल्याशी संवाद साधते.

बायकांनी

ओलांडला असला उंबरठा

तरी आजवर मोडली नव्हती चौकट

आज मात्र त्या निघाल्याहेत

सगळ्याच चौकटी मोडत

कात टाकलेल्या नागिणीसारख्या सळसळत

वाट अडवणाऱ्या प्रत्येक पावलाला डसत !

आता तिला कोणीही अडवू शकत नाही. ती मुक्त होऊ पहाते. नव्या जाणिवेचं, नव्या अनुभूतीचं ती गाणे गाऊ लागते. सामाजिक जाणिवेचं उत्तम भान असलेल्या आणि आपल्या कवितेतून जीवनाविषयीचं मुक्त चिंतन

रेखाटणाऱ्या आजच्या महत्वाच्या कवयित्री म्हणजे वसईच्या संगीता अरबुने. ' बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर' असं लांबलचक शीर्षक असलेला त्यांचा हा चौथा कविता संग्रह ग्रंथाली सारख्या दर्जेदार प्रकाशन संस्थेने नुकताच प्रकाशित केला आहे. आजवर त्यांची एकूण पाच पुस्तके प्रकाशित झाली असून अनेक महत्वाच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले आहे. या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे यातल्या प्रत्येक बावन्न कवितांची सुरवात ही 'बायका' या शब्दापासून होते. या बावन्न कविता वाचत असताना मला खूप पूर्वी वाचलेल्या कवयित्री सुशील पगारिया यांच्या काही ओळींचे स्मरण झाले. त्या म्हणतात :

वस्त्रांच्या ओढीने मागे वळते तो
तू म्हणत होतास,
गुंतणं म्हणजेच आयुष्य !
पदराचे रेशीम धागे
खांबाच्या नक्षीत होते की तुझ्या बोटात ?

स्त्री हा समाजव्यवस्थेचा भक्कम पाया आहे. नातीगोती, मित्रपरिवार घट्ट बांधून ठेवण्याचं, त्यांना खाऊपिऊ घालण्याचं महत्वाचं काम ती करीत असते. तिला कधी बाहेरची क्षितिजे खुणावतात मात्र तिचा पदर घरात अडकलेला आहे. सामाजिक वास्तवाला नेमकं पकडणारी ही कविता बरंच काही भाष्य करून जाते. संगीता अरबुने यांच्याही या संग्रहातल्या अनेक कविता आपल्या अंतर्मुख करतात. ज्या झुळकीमुळे तो पदर झुळझुळता राहिला आहे त्या

झुळकीचे अस्तित्व कवयित्रीने विविध निरीक्षणांच्या माध्यमातून अचूक टिपलं आहे. यामध्ये कुठेही आक्रोश नाही, त्रागा नाही की बंडाची भाषा नाही. आहे फक्त स्त्रीवादी समजेची उत्तम जाण. दैनंदिन कामकाजामध्ये, संसारात व्यग्र असताना एका संवेदनशील स्त्रीने टिपलेली आपल्या आयुष्याची ही टोकदार स्वगतं आहेत. घरातल्या किंवा बाहेरील अगदी साध्यासुध्या प्रसंगाला सामोरं जाताना होणारी बाईची सूक्ष्म घुसमट कवयित्रीनं अचूकपणे टिपली आहे. अनेकांच्या नजरेतून सुटलेली ही स्पंदनं ही कवयित्री मात्र प्रभावी शब्दांतून कागदावर मांडते. ही स्वगतं आपल्याला अस्वस्थ करतात.

सुप्रसिद्ध कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी या संग्रहाची पाठराखण (blurb) केली आहे. त्यात त्या म्हणतात.' आजवर खांद्याभोवती घट्ट पदर लपेटणाऱ्या स्त्रियांनी काळाने बहाल केलेल्या आधुनिकतेच्या, परिवर्तनाच्या सुंदर मुक्त वाऱ्यावर आता आपला पदर झुळझुळत ठेवला आहे. या सुखद शीतल झुळकीचे अस्तित्व संगीता अरबुने यांनी या कवितांमध्ये टिपलं आहे.'

तर आपल्या मनोगतातून कवयित्री संगीत अरबुने या संवाद साधतात. ' बाईची जडणघडण आणि तिचा हा सगळा प्रवास माझ्या जाणीवेला कायम चुचकारत राहिला. त्यातुनच अशा कवितांची मालिका आकाराला आली.' ग्रंथालीने या संग्रहाची उत्तम निर्मिती केली आहे. चित्रकार सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ बोलके आहे.

बायका करत नाहीत आताशा स्वप्नांना पिनअप

त्या झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर

a

असं लक्षवेधी, प्रत्ययकारी, अल्पाक्षरी लिहीणाऱ्या या कवयित्रीकडून आता वाचकांच्या अपेक्षा नक्कीच वाढल्या आहेत. कवयित्री संगीत अरबुने यांच्या पुढील लेखन प्रवासास खूप शुभेच्छा.

(बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर (कविता संग्रह): कवयित्री संगीता अरबुने, प्रकाशक : ग्रंथाली, मुंबई.)

६३. ** प्रगल्भ कवितांचा कॅनव्हास **



हे सूर्या मी नाकारते तुझे अस्तित्व
सकाळच्या सूर्यकिरणांबरोबर जर
कुस्करली जात असेल एखादी कळी तर
का अर्घ्य द्यावं मी त्या किरणांना...

अंधारात होणारी कुकर्म आता
सरेआम तुझ्या प्रकाशात होत असतील
तर तुझ्या त्या तळपणाऱ्या तेजाचं रे काय
एखाद्या वासनांध पुरुषाच्या वासना
उफाळून येत असतील तुझ्या अस्तित्वातही
तर धिक्कार आहे तुझ्या तेजाचा...
म्हणून मी नाकारते तुझे अस्तित्व...

आपल्या गोळीबंद कवितेद्वारे थेट सूर्याला उपप्रश्न विचारून त्याचे अस्तित्व नाकारणाऱ्या कवयित्री सौ माधुरी चौधरी यांचा 'आयुष्याच्या कॅनव्हासवरील अस्वस्थ रेघोट्या' हा चौथा कविता संग्रह हाती आल्यावर कवयित्रीबद्दलच्या अपेक्षा नक्कीच वाढल्या. आपले बालपण, आपला गाव दूरवर सोडून विज्ञान शाखेचा अभ्यास करणारी ही संवेदनशील कवयित्री इथे शहरात जगताना, आपला संसार फुलवताना आपल्या गावाकडच्या आठवणींना मात्र ती विसरलेली नाही. अस्वस्थ भोवताल असलेल्या तिच्या

शहरात गावाकडच्या हुरहूर लावणाऱ्या आठवणी तिला व्याकुळ करतात. दुर्देवाने खेडोपाड्यातल्या समस्या, जगण्यातल्या वेदना अजूनही संपलेल्या नाहीत. तर इकडे शहरं, महानगरं पूर्णतः बदलली आहेत, संदर्भ बदलले आहेत. इथे शहरात देखील सामाजिक जीवन, राजकीय स्थित्यंतरे, व्यवस्था, स्त्रियांच्या विविध समस्या, नातेसंबंध, ताणेबाणे, अत्याचार, विविध पातळीवरचे शोषण कवयित्रीला अस्वस्थ करते आणि अगदी सहजपणे आपल्या काळजातला हुंकार, तगमग, अस्वस्थता ती कागदावर उमटू लागते.

मी बालपणीच्या आठवणी
सोडल्या त्या परसात
त्या आठवणीत रमावे
बस हीच आस जीवास

या गावाकडच्या मायेच्या आठवणी मात्र कवयित्रीचा अदृश्यपणे पाठलाग करतात. एकेका श्वासासाठी, भुकेसाठी हे शहर आपली सर्वार्थाने परीक्षा बघते. हे शहर कवयित्रीला परके वाटू लागते. या चकचकीत शहराचा दुसरा भयाण चेहरा तिला अस्वस्थ करतो.

ग्लानी आलेल्या शहरावर
पोसले जाणारे हजारो गर्भ
नाळ मात्र जोडून असतात गावाकडे
अन बाळंत झालेली शहरं
तडफडतात अगम्य वेदनांनी
उसन्या मातृत्वाचा शिक्का बसल्यावर !

या संग्रहातल्या एकूण अठ्ठावन्न कविता अनुभवताना वाचक भोवंडून जातो. अडगळीतील आई, तो लिहितो, एखादेच, शहर... एक सरोगेटेड मदर, बलात्कार, परस माहेरचा, सुखाच्या पलीकडे, आयुष्याच्या कॅनव्हासवरील रेघोट्या, वचन आठवे, हॅ सूर्या, बाबासाहेब पुन्हा एकदा जन्म घ्या, भूक, तुझ्या फाशीनंतर, अशा अनेक कविता आपल्याला वेगळ्या प्रकाराच्या अनुभूती देतात. कवयित्रीने आपल्या मनोगतात सांगितले आहेच की या संग्रहातील कविता ह्या समाज जीवन आणि स्त्री जीवन याच्याशी निगडीत आहेत. आणि ते खरेही आहे. या कविता संग्रहाला आजचे महत्वाचे समीक्षक श्री पी विठ्ठल यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. ते म्हणतात ' कवयित्रीचं आपल्या भूतकाळाशी एक जैविक नातं आहे. त्या नात्यातून तिला वजा होता येत नाहीये. किंबहुना या काळातल्या आठवणीच तिच्यातल्या सर्जनशीलतेला अधिक विस्तृत करतात. माधुरी चौधरी यांची कविता सभोवताल आणि स्त्रियांचं जगणं समजून घेणारी संवेदनशील कविता आहे.' तसेच या कविता संग्रहाची पाठराखण (Blurb) केली आहे ज्येष्ठ साहित्यिक डॉ दादा गोरे यांनी. ते म्हणतात ' आयुष्य एक कॅनव्हास आहे आणि या कॅनव्हासवर कवितारूपी अस्वस्थ रेघोट्या मारताना स्त्रीची होणारी मानसिक कोंडी आणि स्त्री-पुरुष नात्यातील विखारही दूर करू पाहते.'

या महत्वाच्या संग्रहाची निर्मिती, सजावट, मांडणी काव्याग्रह प्रकाशन यांनी सुरेखपणे केली आहे. प्रसिद्ध चित्रकार श्री प्रदीप खेतमर यांनी अमूर्त रूपात साकारलेलं पेंटिंग संग्रहाच्या शीर्षकाला आणि आतील ऐवजाला अगदी साजेसे आहे.

निसटलेल्या आयुष्यावर
ओघळत जातात अश्रू अन
तरण्याबांड स्वप्नांना देत जातो खतपाणी
प्रौढ भावनांचे, अन निष्ठूर अनुभवांचे
करत राहतो पायाभरणी पुन्हा पुन्हा
आयुष्यात रंगीत रेघोट्या मारण्यासाठी !

आयुष्यावर असं मनस्वी आणि नेमकं भाष्य करणाऱ्या कवयित्रीच्या लेखनाचा कॅनव्हास हा अधिकाधिक समृद्ध होवो, बहरत जावो अशा शुभेच्छा देऊन थांबतो.

(आयुष्याच्या कॅनव्हासवरील अस्वस्थ रेघोट्या (कवितासंग्रह) :कवयित्री माधुरी चौधरी, प्रकाशक : काव्याग्रह प्रकाशन, वाशीम.)

a

६४. ** स्मरणरंजनाचा कॅलिडोस्कोप : स्थानपोथी **

' एका गुलमोहराला लालभडक फुलांचा गुच्छ आला आहे. काटेसावरीचं झाड त्या आधीच आग ओकल्याप्रमाणे लाल फुलांनी बहरलंय, सोनमोहरही आता आपल्या लहान लहान पिवळ्या फुलांनी भरून जाईल आणि ठिकठिकाणी त्या झाडाखाली पिवळ्या रंगाचे सडे अंथरलेले दिसतील. या दिवसात जांभूळ आपल्या फळभाराने जडावलेला असतो आणि त्याची असंख्य फळे जमिनीवर पडून निळे, जांभळे ठिबके पडल्याचं दिसतं.'



भटकंतीच्या, पर्यटनाच्या निमित्ताने म्हणा किंवा अगदी सहज मॉर्निंग वॉकच्या निमित्ताने म्हणा आपणा सर्वानाच दोन घटका निवांत निसर्गाच्या सहवासात रमायला मनोमन आवडतं . सभोवतालच्या निसर्गाचे आविष्कार कोणी डोळ्यात साठवतं, कोणी आपल्या मोबाईलमध्ये बंदिस्त करतं तर कोणी हे वैभव कागदावर शब्दबद्ध करतं. आणि हे सारं शब्दात मांडणारा लेखक हा संशोधक वृत्तीचा, समीक्षक दृष्टीचा आणि तरल कवी मनाचा असेल तर ? वाचकाला ती एक महापर्वणीच

असते. तो लेखक एकीकडे विविध संदर्भांचं, निरीक्षणांचं, नोंदींचं घबाड आपल्यासमोर उलगडतो तर दुसरीकडे त्यातली मानवी मनाची भावव्याकुळता हळुवार टिपतो. यथावकाश वाचक त्यात हळूहळू गुंतत जातो आणि स्वतः समृद्ध होतो. ' स्थानपोथी' हे त्यांचे सत्ताविसावे पुस्तक वाचताना आपल्या प्रत्येकाला ही अनुभूती येईल याची खात्री आहे.

डॉ अनंत देशमुख. संशोधन क्षेत्रातलं एक महत्वाचं नाव. चरित्र, समीक्षा, कथा, संपादन, प्रवास वर्णन, ललित लेखन, स्फुटलेखन, अशा सर्व प्रकारात देशमुख सरांनी विपुल लेखन केलं असून आजवर त्यांची एकूण सत्तावीस पुस्तके प्रकाशित झाली असून अजून चार पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. एक उदाहरण म्हणून 'र.धों. कर्वे' हा उत्तुंग संशोधनाचा एकच विषय पुरा आहे. विविध संस्थांचे मानाचे पुरस्कार त्यांना लाभले आहेत. एरव्ही संशोधक, समीक्षक म्हंटले की ते खूप रुक्ष, गद्य लिहितात असा सर्वसाधारण वाचकांचा आक्षेप असतो. मात्र देशमुख सर त्यास अपवाद आहेत. आपल्या सहजसुंदर, संवादात्मक, काव्यात्मक शब्दशैलीत त्यांनी हे पुस्तक लिहिलं आहे हे महत्वाचे. रूढार्थाने या लेखनाला प्रवासवर्णन म्हणता येणार नाही किंवा निबंध लेखनही म्हणता येणार नाही. तर ही आहेत लक्ष आठवणींनी चिंब भिजलेली आणि ललित लेखनशैलीच्या अंगांनी जाणारी काही स्मरणचित्रे. आयुष्याच्या विविध टप्प्यांवर देशविदेशातील विविध स्थळांचा, स्थानांचा घट्ट सहवास लेखकाला लाभला. त्या उत्कट अनुभूतीची, नात्यांची, आठवांची, निसर्गाची, सूक्ष्म निरीक्षणांची आणि सगेसोयऱ्यांची विलक्षण शब्दचित्रे म्हणजेच 'स्थानपोथी'. या स्थानपोथीत एकूण २१ स्थानं आहेत. ठाण्यापासून निघालेला

हा वाचकयात्री सारळ, जैतापूर, रत्नागिरी, गुहागर, कराड, मुंबई, पुणे, दार्जिलिंग अशी दरमजल करीत थेट अमेरिकेपर्यंत येऊन पोहोचतो. कुठलेही पान उघडावे आणि त्या त्या स्थानाच्या रम्य आठवणींच्या प्रदेशात रमावं इतकं सोपं.

शब्दमर्यादेचं भान लक्षात घेऊन काही उत्कट, मोजक्या निरीक्षणांचा, नोंदींचा धांडोळा घेऊया. रेवस जवळचे बागदांडे लेखकाचे जन्मगाव. आजोळ मिरजचे. पुढे शिक्षणाच्या निमित्ताने सारळ, अलिबाग, जैतापूर, रत्नागिरी करीत नोकरीच्या निमित्ताने मुंबईत येऊन ठाणेकर झाले ते कायमचे. नंतर पर्यटनाच्या निमित्ताने झालेलं स्थलदर्शन. त्यांची दोन्ही मुलं उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेली, तिथेच स्थिरावली. तेव्हा त्यांना भेटायला गेल्यावर अनुभवलेली अमेरिका वगैरे सारं सारं संचित या पुस्तकात बंदिस्त झालेलं आहे. या लेखाच्या वर उद्धृत केलेल्या ओळी ठाण्याच्या बारा बंगल्याच्या निसर्गरम्य परिसरातल्या आहेत.

' काळ ही सतत गतिशील गोष्ट आहे. जे आजचे आहे ते अल्पावधीतच कालचे होते आणि उद्या साक्षात वर्तनाम होऊन आपल्या समोर उभा राहतो.' लेखकाची ही ओळ मनावर ठसते आणि त्याचा प्रत्यय आपल्याला पानोपानी येतो. ४०-५० वर्षांपूर्वीचे ते ठाणे, तो काळ, ती माणसं, त्या वास्तू, तो निसर्ग, प्रसंग देशमुखांना अस्वस्थ करतो. त्या आठवणींमध्ये ते रमून जातात. एकीकडे पी सावळाराम, म पां भावे, अरुणराव कर्वे, सुमती फडके, येसूताई पेंडसे, राजाभाऊ गवांदे, राम मराठे, मामा पेंडसे अशा ठाणेकर दिग्गजांच्या कर्तृत्वाचे ते स्मरण करतात तर दुसरीकडे घराच्या फ्रेंचविंडो मधून दिसणारे, बहरणारे महावृक्ष देखील त्यांना आर्त साद घालतात. सप्तपर्णी, सोनमोहर, सावर, यांची

भावचित्रे अप्रतिम. जन्मगाव बागदांडे. तिथला निसर्ग, आईबाबा, ती शाळा, शिक्षक, बालपणातल्या आठवणी, ग्रामजीवन, स्त्रीजीवन, नातेबंध, कौलारू घर आणि त्यात भिजलेल्या आठवणी त्यांना व्याकुळ करतात. १७ जुलै १९४७ रोजी रामदास बोट तुफानात बुडाली त्याच्या आठवणी त्यांच्या वडिलांकडून त्यांनी ऐकलेल्या. आजोबांच्या डायऱ्या आणि काही दुर्मिळ पुस्तकं मिळाल्याचा आनंद ते शेयर करतात. गावाकडच्या गणेशोत्सवाचे लोभस वर्णन देखील वाचण्यासारखं. लेखकाला समुद्राचं विलक्षण आकर्षण. मत्स्यभान, सागरी जीवन, निळा समुद्र अशा लेखातून तो डोकावतो.

जैतापूरच्या न्यू इंग्लिश स्कुल शाळेतल्या आणि नंतर रत्नागिरी गोगटे कॉलेज मधल्या मित्रांच्या आठवणी वाचण्यासारख्या. आजोळच्या, मिरज कराडच्या आठवणी भावुक करतात. एके ठिकाणी ' सर्वत्र ऊसमळे. साडेपाच फूट उंचीच्या दांड्यांवर जादूगाराच्या शिरपेचात असतात तसे मुलायम रुपेरी झुबकेदार तुरे लांबूनच सूर्यप्रकाशात चमकत. त्यावर पाखरांचे लक्ष थवे लयीमध्ये घिरट्या घालत ' ही सुंदर ओळ लेखकाच्या कवित्वाची साक्ष देते. कृष्णेच्या काठावर वसलेलं औदूंबर. त्या काठावर काव्याचे मळे फुलवणारे कविश्रेष्ठ सुधांशु. त्यांचा सहवास. जीवनदायी नदीचं सुंदर रूप रेखाटताना लेखक नदीशी समरस होतो. १९७० सुमारास नोकरीच्या निमित्ताने लेखकाला मुंबईचे महाविराट दर्शन घडतं. एकीकडे रेल्वेस्टेशनवरची प्रचंड गर्दी, गोंधळ, चाकरमानी, चाळसंस्कृती, ब्लॅकआउट आणि आणीबाणीचे दिवस अनुभवताना दुसरीकडे नाटक, चित्रपट, ग्रंथव्यवहार, कलादर्शन, शिक्षणाची आस, दिग्गजांचा सहवास, मार्गदर्शन लेखकाला नकळत लाभत होते, समृद्ध

होत होते. कवीकट्टा लेखात मुंबईतल्या समीक्षकांचा, संशोधकांचा, कवी-लेखकांचा परिचय लेखकाला कसा, केव्हा झाला हेही विषद केलं आहे. बोरघाट रस्त्यासंबधीची दुर्मिळ माहिती मिळते. लेखकाला उभ्या आयुष्यात विविध प्रांतातील अनेक घरांचा उबदार सहवास लाभला. तरीदेखील सिनिअर सिटीझन होम्सची (विजनवासाची) ओढ त्यांना का लागली असावी असा प्रश्न आपल्याला पडतोच. तिथे ते अर्थातच रमले नाहीत. तिथलं विश्व मात्र निःशब्द करतं. उत्तरार्धात आपल्याला दार्जिलिंग, गंगटोक,लाचुंग निसर्गरम्य स्थळांची वर्णने वाचायला मिळतात. तर अखेरच्या टप्पात आपण सहजपणे अमेरिकेत पोहोचतो. लेखकांच्या दोन्ही मुलांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर आपली स्थानं तिथं निर्माण केली आहेत याचे समाधान लेखकाला आहेच. न्यूयॉर्क, सॅन फ्रान्सिस्को, वॉशिंग्टन, बोस्टन, डेट्राईट इथल्या शहरांची खासियत, संस्कृती, कला याची वेगळी ओळख लेखक वाचकाला करून देतात.

ठाण्याच्या कृष्णा प्रकाशनची ही निर्मिती दर्जेदार आणि देखणी आहे. चित्रकार सतीश भवसार यांचे मुखपृष्ठ केवळ अप्रतिम. स्मरणरंजनाचा हा देखणा, भावस्पर्शी कॅलिडोस्कोप निरखताना वाचक त्यात नक्कीच रंगून जाईल असा मला विश्वास आहे.

(स्थानपोथी (लेखसंग्रह) :लेखक : डॉ अनंत देशमुख, कृष्णा प्रकाशन, ठाणे)

****

a

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष
श्री रामदास खरे यांचे हे ईसाहित्यवरचे पाचवे पुस्तक

श्री रामदास खरे हे मूलतः एक सजग वाचक, आणि रसिक. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या चित्रांत, कवितांत व सर्व प्रकारच्या लेखन व्यवहारांत उमटते. त्यांचे अनेक काव्यसंग्रह आणि ललित लेख संग्रहही छापिल स्वरुपात प्रसिद्ध आहेत. साहित्यिक वर्तुळांत ते सुप्रसिद्ध आहेत आणि अनेक प्रकाशक मंडळी त्याचे स्नेही आहेत. तरीही ते आपली काही पुस्तके ई साहित्यवर प्रकाशित करतात.

ई साहित्य प्रतिष्ठान हे मुख्यत्वे तरुण नवोदित लेखकांचे व्यासपीठ. पण त्याला एक भारदस्त स्वरूप येते, जेव्हा श्री. रामदास खरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४९), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका

बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१९), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी(३), यशवंत कदम(७), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखा्नीस(२), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३) श्रीराम काळे, शैलेश पुरोहित(४) राजा कदम असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

।आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ‘इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी॥